
ईस्पर्श
दिवाळी २०१२
eसाहित्य प्रतिष्ठान

# इत्यर्थ

## दिवाळी अंक. नोव्हें. २०१२

संपादक मंडळ
सृजा
नाम गुम जायेगा
तनवीर सिद्दीकी

मुखपृष्ठ: कनक वाईकर
अंतर्गत मांडणी आणि सजावट: सृजा

©लेखनाचे सर्व हक्क लेखकांच्या स्वाधीन. प्रकाशनाचे सर्व हक्क ई-साहित्य प्रतिष्ठानच्या स्वाधीन. या ई-पुस्तकात घेतलेल्या प्रतिमा पब्लिक डोमेन वरील आहेत.


इत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. यात नमूद केलेली मते व विचार लेखकाचे वैयक्तिक विचार आहेत. संपादक मंडळ यांच्याशी सहमत असेलच असे नाही.

संपर्क: ई साहित्य प्रतिष्ठान
अकरावा मजला (जी ११०२)
ईटर्निटी
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे
ठाणे ४००६०४.
मो. ९८६९६७४८२०

वेबसाईट : www.esahity.com

ईमेल : etyarth.esahity@gmail.com





# आठवणींची भरता शाळा

# आठवणींची

# भरता शाळा

आठवणींची भरता शाळा
वर्ग रिकामा मनास छळतो
रूप लेवूनी सावित्रीचे
बाईंचा चेहरा तरळतो

खडूफ़ळ्याची सोबत आणिक
दप्तर विटके, फ़ुटकी पाटी
बालपणीचे सरले वैभव
सोनसयींची मनात दाटी

पायही होते अनवाणी अन
गणवेषाची कुठे झळाळी
परी ज्ञानाची खरी खुमारी
वास्तुतुनी या आम्हा कळाली

बालभारती पुस्तक, केवळ
पुस्तक नव्हते अमुच्यासाठी
शब्दफ़ुलांची नक्षी रेखीत
मनात रुजली मायमराठी.


नव्हती जरी गणिताशी गट्टी
छडीने पाढे पाठ करवले
वीण मैत्रीची घट्ट जोडुनी
सवंगडी परी दूर हरवले.

शेणाने सारवल्या भुईवर
अंथरण्या जरी नव्हते बस्कर
शिवबापरी त्या सांगत गोष्टी
जोजविले तुम्ही अमुचे अंतर

वाट्या काट्या बाराखडीतून
गेलो अक्षर अक्षर गिरवत
मैत्र जीवाचे होऊन अवघी
हीच अक्षरे आली सोबत

जपला, जपतो मनी निरंतर
शाळेचा हा लळा जिव्हाळा
हुरहुर परी दाटते अंतरी
आठवणींची भरता शाळा

-----किरण भावसार



संपादकांच्या लेखणीतून

जन्मपत्र
सृजा

१५ ऑगस्ट
तनवीर सिद्दीकी

भावे काकूंचा डबा
आनंद भातखंडे

मोठ्यांच्या छोट्या आठवणी
शशिकांत ओक

त्याने मला तीन वेळा स्पर्श केला पण..
अनघा हिरे

आठवणीतली तीन मोरपिसं
श्रीपाद कुलकर्णी

सोबतीला फक्त आठवणी
कुणाल रुद्रके

भागम भाग
मच्छिंद्र म्हात्रे

पर्यावरण विषयाची वही
जयसिंग कांबळे

कविता

# संपादकांच्या लेखणीतून

वाचकहो, गेल्या सहा महिन्यांपासून आपण दर महिन्यातून एकदा पत्ररूपाने भेटतोच. पत्ररुपाने अर्थातच इत्यर्थच्या माध्यमातून. इत्यर्थचा प्रत्येक अंक बनवणं हे आपल्या भावना कागदावर मांडण्यासारखंच असतं. बदलत जाणाऱ्या काळात लेखनाची आणि मांडणीची स्वरुपं बदलली तरीही भावना बदलत नाहीतच. आणि आठवणीही.

दर वर्षीच  दिवाळी आली की प्रत्येकालाच आपल्या माणसांचे, आपल्या गावाचे, आपल्या आवडीच्या वस्तूंचे वेध लागतात. त्या प्रत्येक गोष्टीशी आत्म्याची एक बांधिलकी असते. एक नातं असतं अस्पष्टसं पण तितकंच अनमोल आणि जिवाजवळचं. जगात लाखो विषय पडलेले असताना आम्ही दिवाळी अंकासाठी “आठवण” या विषयाची नेमणूक फक्त तेवढ्याखातर केली. कारण आपल्या आयुष्यात आठवणी कदाचित सगळ्यात मोठं धन आहेत.

म्हणून तर यावेळी आम्ही ठरवलं. की फक्त लेखकच नव्हे तर संपादकांनीही या आठवांच्या सरींत न्हायचं. आम्हाला काय वाटतंय ते आठवांच्या बोलातच सांगायचं आणि म्हणून यंदाच्या अंकात इत्यर्थच्या तीन्ही संपादकांची एक एक रचना समाविष्ट केली आहे. ते तुम्ही गोड मानणं हीच आम्हाला आमची दिवाळी भेट.

जगभरातल्या तमाम मराठीजनांना दिवाळीच्या मनापासून शुभेच्छा.

सृजा
इत्यर्थ संपादक







# जन्मपत्र

सृजा

त्याच्या डोळ्यात पाहिलं होतं मी एक स्वप्न.. त्यावेळी समजून बसले की  मीच त्याचा तारा. पहाटेच्या क्षितिजावर बसून माझ्या खिडकीकडे पाहत असलेली एक नजर मला सततच जाणवायची. आणि माझ्याच मनाची समजून की नजर त्याचीच ती.. आणि मी सुद्धा त्याचीच.

एक दिवस आलाही तो हळूच. धुक्यातून अलगद पडत्या कोवळ्या उन्हासारखा. माझा जीव त्याच्या नजरेतच पाणी पाणी होऊन गेला. नजर उठेना.. कोरडा आवंढाही उतरेना घशाखाली. हातावर घामाचे थेंब. पाय लटलट कापणारे. छातीत काहीतरी इतक्या जोरात वाजत होतं की बस्स! पोटात गोळा उठला आणि आणि काय काय झालं ते माझं मलाही कळलंच नाही. मी माझी नव्हतेच कधी पण तरीही क्षणभरातच त्याची होऊन गेले.

माणसं मरण्याआधी मृत्युपत्र लिहितात. हा पैसा ह्याला, ती जागा त्याला वगैरे वगैरे याद्या करतात. आपल्या गोष्टींची काही विल्हेवाट लावतात तर काही वासलात लावतात. पण मला नेहमीच वाटतं. की जन्माआधी चित्रगुप्त आपलं जन्मपत्र तयार करत असावा. आयुष्याचा हा काळ या एकाच्या नावावर, तो काळ त्या एकाच्या नावावर लिहीत असावा. जन्म घेऊन पायावर उभं राहीपर्यंतचा काळ त्यानं सर्वस्वी मायबापाच्या नावावर लिहिलेला माझा.. आणि पायावर उभं राहण्यापातून पंख फुटण्याच्या वयात पाऊल जसं ठेवलं तसा पुढचा प्रत्येक श्वास त्याच्या नावावर लिहिला चित्रगुप्तानं. प्रत्येक श्वास, प्रत्येक संवेदना, अनुभूती, वेदना, सहवेदना, सृजन, शील, अस्तित्व असं सगळं त्याच्यासाठी.. सारं जगणं मग त्याच्यासाठी.

माणसाचं मन मोठं विचित्र. त्याच्याही पापण्यांना स्वप्नं बांधलेली असतात. त्याचे डोळे तेच फक्त पाहतात जे त्यांना पहायचं असतं. कान तेच ऐकतात जे ऐकायचं असतं. स्पर्शाची भाषा सुद्धा फक्त हवे तेच संदेश देते. तनामनात तो एकच गंध भरून राहिलेला. सुखाची चव कणाकणात साठलेली.. अजाण.. भाबडी स्वप्नं...

क्षण, तास, दिवस, महिने, वर्ष सरत जातात.. आजुबाजूचा रंगमंच बदलतो, संवाद बदलतात, नेपथ्य आणि संगीत बदलतं मात्र पात्रं तीच. पहाटेच्या क्षितिजावर भेटलेली. माझ्या मनाचा तो खेळ तिसऱ्या घंटेचीही वाट पहात नाही. त्याची जादू तर मध्यानराती सवार..
फक्त...
फक्त.....
नाट्य आणि नाट्यछटा यातला फरक काही चित्रगुप्तानं ग्राह्य धरला नसावा. मनानं उभारलेलं हे नाटक खरंतर एक नुसतंच निरंतर स्वगत आहे हेही मला कधी जाणवलं नसावं. हातात असूनही नसलेला तो हातही कळला नाही. स्वप्नांमध्ये रंगलेला डोळ्यांना त्याच्या पापणीमागचा आरसाही कधी दिसला नाही. नातं कुठलं.. त्याच्या मर्यादा काय.. भानही कधी राहिलं नाही. आणि मी नुसतीच श्वास जोडत गेले त्याच्या नावावर कुठल्याश्या जन्मातल्या कर्जाच्या परतफेडीसारखे.. मी नेहमीसारखीच बेफाम.. दरीत झेपावलेल्या नदीसारखी. मात्र ज्याला माझा समजत होते तो किनारा एका अचल पर्वताचा फक्त पायथा आहे हेही ध्यानी राहिलं नाही.

मग व्हायचं तेच झालं.. एका धबधब्याच्या कड्यावर उभं राहून तो सहजच बोलून गेला.. "काही गोष्टी अधुऱ्या राहिलेल्याच बऱ्या असतात." आणि मग तिथं जाणवलं की हा आपला मध्यबिंदू. पुढं पाताळखोल दरी आहे. किनारा मागंच सुटला. तो आपला नव्हताच कधी आणि तो आजही अचल आहे. आणि मग आली ती उडी.. पाताळाकडे.. आपलं अस्तित्व संपल्यासारखी..

एक गोष्ट नक्की. जोवर आपण पडत असतो उंचावरून, भिती तोवरच वाटते. एकदा खालच्या जमिनीवर आपल्या चिंधड्या झाल्या की मग उरते ती फक्त स्मशानशांतता. भेसूर. थंड..
सगळ्या भावनांनी फारकत घेऊन मला एकटं पाडलं.. आणि मग लख्खकन प्रकाश पडला. आणि जाणवलं.. माझ्याच मनानं बनवलेल्या या रंगमंचावर मी एकटीच आहे. मी नेहमीच एकटी होते. ती धडधड, लटपट, पोटात उठणारे गोळे, नजरेनंच पाणी पाणी होणं.. ते सगळं सगळंच माझं एकटीचं होतं. त्याचं नाहीच कधी.

त्याच्या जन्मपत्रात दुसऱ्या कुणाच्या नावावर लिहिलेले श्वास कधी होते की नाही ते एक चित्रगुप्तच जाणे!

माझ्या जन्मपत्रात मात्र त्या कड्यानंतर फक्त शांतता आहे....



# १५ ऑगस्ट

तनवीर सिद्दिकी

बराच वेळ तो सोफ्यावर विचार करत बसला होता. कधी त्याला तो प्रश्न अगदीच अशक्यप्राय किंवा किचकट वाटे तर कधी अगदी खुळचट विचार असल्यागत जाणवत होते.उन्हं उतरणीला लागली होती. हलकासा पाऊस आभाळात दिसत होता. दररोजप्रमाणे संध्याकाळच्या गप्पा मारायला अभिप्रेत असणारा एक साजेसा मूड वातावरणात त्याला दिसला खरा पण तो आज त्याला त्याच्यासाठी तेवढा उपयोगाचा, तेवढा मोहक वाटत नव्हता.तरी दैनंदिनीचा एक भाग 'गप्पा' आठवून सोफ्यावरून उठून तो आपल्या खोलीकडे जायला वळला. खोलीच्या दरवाज्यावर असलेल्या फिंगर प्रिंट टेक्नोलोजीच्या सेन्सरसमोर 'फीड' असलेली त्याची अनामिका त्याने  वेरीफिकेशनसाठी लावली. बोटाच्या खुणा चाचपून आपोआप उघडलेल्या दरवाज्याचा लैच ढकलत तो आत आला. आतमध्ये शिरताचक्षणी ४० डेसिबल पेक्षा कमी आवाज सेन्स करू शकणारया त्याच्या वैयक्तिक रोबोटने त्याचा श्वासोच्छवास सेन्स करून आणि पडताळून 'मालक' आत आल्याची नोंद केली होती. त्यानुसार लगेच यांत्रिकी अदबीने आणि चालीने तो त्याच्याजवळ येत त्याच्या होम मोड मधल्या प्रोग्राम्ड सोफ्टवेअरनुसार त्याने मराठीतून विचारपूस केली “काही हवे का मालक?'

'नाही'. त्याने तोंडाने नकार दर्शवला.

'ठीक आहे.'

'अरे, बरं एक काम कर. आता जूस प्यायचा मूड आहे आणि मित्राबरोबर गप्पा मारायची पण वेळ होत आहे.जा, आण लवकर.माझ आवडत 'गुलाब' फ्लेवर आण.' - त्याने आज्ञा दिली.

'दिवसात १८० मिलीलिटर पेक्षा जास्त शर्करा तुमच्या पोटात गेली तर तुमची साखर पातळी वाढेल, तुम्हांला मंजूर आहे का हे मालक?' -क्षणाचाही विलंब न करता रोबोटने प्रतिप्रश्न केला.

त्याने रागाने जीभ चावली. राजनने-त्याच्या मुलाने 'सेव' केलेल्या कमांड्स आठवल्या. त्यावर दातओठ खात, हतबलतेने रोबोटला  'फक्त पाणी आण मग' अशी आज्ञा देवून तो पाठमोरा झाला. बेडवर येवून बसला . रूममध्ये असलेल्या क्लैप सर्किटला टाळी वाजवून आज्ञा दिली. टाळी वाजवल्यावर लगेच सर्व विद्युत उपकरणे चालू झाली. रोबोट परतीची वाट धरून जात असताना ह्याने मग आपला आय-वाल चालू केला आणि रिमोटचे बटन दाबले.

क्षणार्धात भिंतीवरचा पडदा बाजूला झाला. पांढऱ्याशुभ्र भिंतीला दिलेली त्याच्या आवडीची नारंगी रंगाची किनार त्याला क्षणभरासाठी सुखावून गेली. त्यासमोर फीट केलेले 'लेसर रे' चालू झाले. स्क्रीन तयार झाली. लेसरशी कनेक्टेड असणारा अन्टेना सूर्यफुलासारखा पंख्याला सूर्य समजत वर पाहू लागला आणि भिंतीवरील आय-वाल वर अनुमतीत्मक ऑप्शन आले.

- फोन करणार?
- टीवी बघणार?
- इंटरनेट हव का?
- घराची इतरत्र कामे?
- खरेदी?
- बिल भरायचे आहे का?
- अजून काही मदत हवी?

त्याने फोनचा ऑप्शन दाबला. ६ जी च्या कृपेने चार सेकंदात त्याचा मित्र दत्ता गोखले समोर दिसायला लागला. कॉलमागचे थीम दृश्य नेहमीप्रमाणे बागेचे सेट करून रोजच्यासारख दोघांनी वर्चुअल बागेत बसून गप्पा मारायला सुरवात केली.

'काय रे दत्ता, कसा आहेस?
''चाललंय रे. तू सांग.'
'बागेची बुकिंग झालीये का?'
'अरे हो. सांगणारच होतो आता. येत्या शुक्रवारची वेळ भेट्लीये. पण दुपारची आहे - ३ ते ५. मस्त झाडाखालचा बेंच. तुला न विचारताच मग बुक केला. त्याच काय झालं, संध्याकाळची वेळ अजून १८ दिवसानंतरची होती रे. चालेल ना?

'अरे काही त्रास नाही. तू बरोबर केलंस. खूप मूड आहे खऱ्या बागेत जायचा लवकरच. आज काय?.-सोमवार ना?' - त्याने स्क्रीनच्या टोकाला बघत वार कन्फर्म केला आणि त्यामुळे सोबत दिसणारी आणि त्याला सतावणारी आजची तारीख बघणे चुकवणे त्याला टाळता आले नाही.

'५ ऑगस्ट २०४७!!'
'

'मालक पाणी' त्याच्या रोबोटने पाणी आणून ठेवले तसा तो हलकासा दचकला. तारीख व्यथेतून स्वत:ला बाहेर आणत 'ठीक आहे, तू आता स्लीप मोड मध्ये चार्ज हो' अशी त्याला आज्ञा दिली. पाणी गटागट संपवले आणि दत्ताशी पुन्हा संभाषण चालू केले.

'काय रे काय झालं?आज थोडा त्रासात दिसतोहेस'
'हो रे, काल थोडं अमितने एका घोळात टाकले आहे.'
'का रे? आता काय नवी खोड काढली तुझ्या नातवाने?'
'अरे तशी फारशी सिरीयस नाहीये. पण विचाराधीन झालो आहे त्यामुळे'
'सिरिअस नाही ना. मग सोड ना. का त्रास करून घेतो?.फुकट बिपी वाढला आणि रोबोटने सेन्स केल तर ऑटोमेटिक कॉल जाईल की फैमिली डॉक्टरला. मग राजनला -प्रियाला त्रास . नाही का?' - दत्ताने समजूत काढत सांगितले.
'हम्म. बरोबर आहे रे तुझ.'
'पण अस काय विचारलं जे सतावत आहे तुला?'
'अरे अमितने तर अगदी साधेपणाने पण जटील प्रश्न विचारला रे. काल शाळेतून घरी आल्यावर म्हणतो, आजोबा, दहा दिवसांनी स्वातंत्र्यदिनाला मी भाषण करणार आहे. मला तुम्ही गाईड करा. मला अगदी वेगळे भाषण करायचे आहे. 'गुगल' वादी नको.'
'हातीच्या एवढंच..!! मग कर की मदत.'
'दत्ता, तुला हे सोप्प वाटलं?'
-
आता तर देश प्रगत आहे. इतका सशक्त आहे की त्याला आता कोणी गुलाम करू शकत नाही. मग त्या मिळालेल्या स्वातंत्र्याची किंमत या पिढीला कळेल?

- देश स्वतंत्र झाल्यानंतरही सर्व माणसे स्वांतत्र्य अनुभवू शकली नाहीत हे आताच्या पिढीला माहित आहेच पण त्यानंतर झालेल्या पिढीने स्वत: समजून सावरून एकजूट होवून खरे स्वतंत्र निर्माण केले त्यामुळे मग अमितच्या पिढीला १९४७ च्या स्वातंत्र्यासाठी धारातीर्थी पडलेल्या क्रांतीविराची बाजू, त्यांचे महत्व, त्यांची शौर्य गाथा पटेल? का त्यांचे राष्ट्रनेते गांधी, सावरकर यापेक्षा वेगळे असतील

- सर्व गोष्टी फक्त इंटरनेट वर दडवून ठेवून, सर्व इतिहास महत्वहीन समजून लपवून, अगदी नोटावरचे गांधीजी - त्यानंतर नोटा ही नाहीश्या करून स्वतःला प्रगत, सुरक्षित, सक्षम म्हणणाऱ्या देशाला अहिंसेची, सत्याग्रहाची बीजे कशी कुठे सुरू झाली त्याची उत्सुकता असेल? कळली तरी त्याचा त्यांना अभिमान असेल?


- वेळेची किंमत गरजेपेक्षा जास्त समजणाऱ्या या पिढीला - जी स्वतःच्या आजोबाशी रात्री बोलायला आधी अपोइन्टमेंट घेते, बापाच्या औषधाची, प्रकृतीची  काळजी कृत्रिम रोबोट घेतो - स्वातंत्र्य काय होते, कसे मिळाले, असे घोकून घोकून सांगितल्यावर ही त्या स्वतंत्र मिळवून देणाऱ्या शूरवीरांसाठी वेळ काढणे जमेल?

'राजन प्रिया आणि अमित घरी आले आहेत याची घरच्यांनी नोंद घ्या' - घराबाहेरच्या सीसीटीवी ने अलार्म दिला आणि तो भानावर आला. तो मन शांत ठेवून सज्ज झाला. जेवणाची वेळ झाली होती.

जेवण झाल्यांनतर अमितबरोबर बसण्याआधी त्याच्या भावना अमितला पटतील की नाही या भ्रमाचे उत्तर त्याला काय मिळेल याची त्यालाही शाश्वती नव्हती पण एक गोष्ट त्याने मनाला समजावली खरी की जर अमितला गांधी, सावरकर, नेहरु आणि त्यासारखे असंख्य क्रांतिकारी -त्यांची शौर्य गाथा, त्यांचे बलिदान पटले नाही, निष्फळ वाटले, त्यांनी मिळवून दिलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ संयुक्तिक वाटला नाही तर त्या भीषण वास्तव्याला जबाबदार तो आणि त्याची पिढी होती- आहे, ज्यांनी भारताला आदर्श-स्वतंत्र-सक्षम भारत बनवण्याच्या स्वप्नाच्या पूर्तीसाठी काहीही प्रयत्न केले नाही. त्यामुळे आपल्या चुकीमुळे जर आपल्या नंतरच्या पिढीला ते शहाणपण आले हे जरी खरे असले तरी पण जर त्या पिढीतल्याच लोकांचे कर्तुत्व - ज्याने भारताला सबळ, प्रगत आणि भारताला खरे स्वातंत्र्य मिळवून दिले, ते लोकांना प्रेरित करू शकले किंवा लोकही प्रेरित झाले. अंततः पर्यायाने जर मग त्यांनी ह्यावेळी, ह्या घटकेला गांधी, सावरकर यांना नाकारून स्वतःचे स्वतःच्या युगातील वेगळेच क्रांतिकारी निवडले असतील तर त्या दुष्कर्मासाठी गांधी, सावरकरांसारख्या असंख्य क्रांतीकारकांना वाईट मानून घेण्याची गरज नाही.

वाईट मानून घ्यायचे आहे ते आपल्यालाच आणि माझ्यासारख्या असंख्य अभिजित खैरनारांना..!!बहुतेक म्हणून अजून या पिढीने स्वातंत्र्य दिन बदलला नाही बहुतेक..आपल्यासारख्यांना स्वतःच्या कृत्याची त्या सर्व क्रांतीकारकांना स्मरण करून त्यांची प्रत्येक वर्षी तरी निदान माफी मागता यावी म्हणून..!!

*त्याची आणि अमितची बातचीत सुरू झाली. आणि हतबल वॉईस टाईपरवर एकच वाक्य टाईप झाले होते.. 'आधी मनातच ठरवले पाहिजे, कशी सुरवात करायची ते'..'म्हणजे काय आजोबा?' - अमितने विचारले.तो फक्त किंचित हसला. म्हाताऱ्या स्वतंत्र भारतासारखा ज्याला १०० वर्षे जगुनही जास्त आनंद न झाल्यासारखा..!!*





# मोठ्यांच्या छोट्या आठवणी

शशिकांत ओक

नुकताच बालगंधर्व चित्रपट पाहिला आणि माझ्या मनातील बालगंधर्वांच्या आठवणी जाग्या झाल्या.
साल असावे १९६२- ६३. सांगलीजवळ माधवनगरची कॉटनमिल प्रसिद्ध होती. तिचे मालक शेठ गंगाधर ल. नातूंना आध्यात्मिक वाचनाचा व श्रवणाचा नाद होता. माझ्या वडिलांचा कापडव्यवसाय कॉटन मिलच्या आश्रयाने होता. माझे वडील अध्यात्मिक मनन व चिंतनात रमणारे असल्याने त्यांची व नातू शेठजींची धंद्याच्या व्यतिरिक्त आध्यात्मिक चर्चेच्या कारणांनी घसट होती.
त्याकाळात वासुदेवराव जोशी किर्तनकार व प्रवचनकार म्हणून सांगलीच्या भागात फार प्रसिद्ध होते. नातू शेटजींच्या पुढाकाराने संत ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाच्या अभंगांवर त्यांच्या निरुपणची व्यवस्था केली गेली. नातू शेठजी मुंबईहून माधवनगरात महिन्यातील काही दिवसासाठी येत. त्या काळात रात्री नऊ वाजता विठठल मंदिरात निरुपणाला रंग भरे. वारकरी संप्रदायाला अनुसरून एक वीणाधारी, २०-२५ टाळकरी, असे त्यांचे निरुपण ३-३II तास चाले. मी तेंव्हा १४-१३ वर्षांचा वडिलांच्या बरोबर ते ऐकायला न चुकता जात असे.
श्री विट्ठल रुखमणी देवालय असे नामाभिधान असलेल्या स्व. प्राणजीवन गोवर्धन दास गप, ऊर्फ प्रताप शेठजींच्या त्या विट्ठल मंदिराची शान होती. बुधगावच्या वाटेवर पथिकांना विश्रांती स्थळ व अनेक भाविकांना, कथेकऱ्यांना, अध्यात्मिक साधकांना साधनापुरक असलेली ती वास्तू १०० वर्षापुर्वी आस्थेने बांधली होती. नुकतेच त्या मंदिराला रंगाचा नवा साज चढवला गेल्याने त्याला अशी नवी झळाळी प्राप्त झाली आहे



दूरवरून दिसणारा कळस, मंदिराच्या प्रवेशद्वारावर शेठजींचा लहान पुतळा, वीणाधारी सरस्वती दोन विशाल सिंहांमधे आसनस्थ आहे.
या दुमजली मंदिरात प्रवेशताना पावसापाणीच्या संपर्काला दूर ठेवायसाठी पत्र्याच्या पन्हाळी, गणवेशातील दोन शस्त्रधारी रखवालदार, वरच्याबाजूला चार ऋषींची सोबत. मधल्या भागात सन १९११ या मंदिरस्थापना वर्षाची नोंद. त्यावर कळसाच्या बाजूला भगवान श्री कृष्ण उभे, समोर एकतारी धारी मीरा, त्या मंदिराच्या परिसरात पांथस्थांना राहायला ओसऱ्या व पडव्या आहेत. मागे विहिर व मंदिराच्या पुजारी व इतर सेवेकऱ्यांसाठी राहायची सोय आहे. मंदिराच्या सभा मंडपात वेलबुट्ट्यातील अर्धकमानी गुलाबी-पिवळ्या रंगाची पखरण असलेले नक्षी काम, समोर भरपूर फुलमाळांनी सजवलेली रुकमणी-विठोबाची मुर्ती. त्यासमवेत गणपती व हनुमानाची लहान प्रतिमा डाव्या-उजव्या बाजूला.
रात्री प्रवचनाच्या दिवशी माधवनगर कॉटन मिल्सचे मालक नातूशेठजीं येणार म्हटल्यावर विशेष थाट असे. सभामंडपात सतरंज्या, मधोमध प्रवचनकारांसाठी रंगीत जाजम. शेठजींसाठी शुभ्र नव्या चादरींखाली मऊमऊ गादी. हात टेकायला लोड, पाठीशी तक्के, समोर पाणी भरलेली चांदीची तांब्या-भांडी. लवंग-इलायचीदाणी. शेठजींच्या पत्नी सौ. अक्का समवेत त्यावेळच्या प्रतिष्ठित स्त्रिया वरच्या मजल्यावरून संकीर्तनाचा आनंद घेत.
काही नोकरमंडळी शेठजींच्या नजरेत भरावे अशा बेताने पितळेचे मोठे दोरीवाले टाळ गळ्यात घेऊन नामसंकीर्तनाच्या वेळी विठ्ठल-विठ्ठल, रामकृष्णहारी असा हरिनामाचा गजर करताना तल्लीन असल्याचे दर्शवत. हुरुपाने नाच करताना आमच्यासाऱख्यांना खुदकन हसू येई. कारण कधी काही कारणांनी शेठजी मधेच उठून गेले तर ही मंडळी टाळ गळ्यातून काढून टाकून टाळीवर येत. कधी कधी एक बोट वर करायच्या बहाण्याने धूराचे झुरके घेऊन गुप्त होत.



बुवांच्या पायाशी डाव्याहाती पेटीवाले, उजवीकडे बापुराव म्हसकर तबल्याची ठाकठुक करून मानेने हो म्हटले की वीणाधारींकडून कथनासाठी जोशीबुवा पागोटे काढून सज्ज होत., कमर खोचून 'जेहत्ते कालाचे ठाई' म्हणून सुरवात केली की त्यांच्या अमोघ वाणीत अवीट रंग भरे. तुकारामांचे अभंग, एकनाथ, नामदेव संताच्या काव्यासह, ज्ञानेश्वरीतील कल्पनाविलास, ओव्या, अनेक कवींचे दाखले, त्यांचे त्यावरील भाष्य माझ्यासारख्या बालबुद्धीला समजले नाही तरी जरूर भावले.

'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा।
पुण्याची गणना कोण करी ।।'

... ज्ञानोबा माउलींनी हरीमुखे म्हणा हे दोनदा सांगण्याचा गूढभाव काय? अगणित पुण्य मिळवायचे असेल तर वारंवार हरीनाम घ्या. असे वेदशास्त्र हात वर करून ठासून सांगण्यातील कळकळ त्यातून व्यक्त होते....

अशाच एका प्रवचनाच्या रात्री बुधगावकरांकडे पाहुणचार घेताना बालगंधर्व आज सेवेला हजेरी लावणार आहेत असे कळले. एरव्ही कधी न फिरकणारे बुधगावकर राजे त्यांच्या समावेत बालगंधर्वांची स्वारी. त्यांना उचलून आणावे लागायचे म्हणून नोकर.. वेगळे तबला पेटीवाले असा फौजफाटा गाडीतून आला. त्यांच्यासाठी आधीपासून दाटीवाटीने गच्च बसलेल्या लोकांना व नेहमीच्या पेटी-तबलेवाल्यांना हटवून कीर्तनकारांच्या सभोवती जागा करून देण्यात आली.

काळी टोपी, सफेद कुडता. गोरा पान वर्ण, क्षीण पण तीक्ष्ण नजर, उपस्थितांना नमस्कार करून विठ्ठलासमोर सेवा करायची इच्छा आहे. आवाज गोड करून घ्यावा असे विनम्रपणे म्हणून हात डाव्या कानाला लाऊन 'पतित तू पावना म्हणविसी नारायणा' भजनाला आरंभ केला. आर्त स्वरात भिजलेले कारुण्य. सहज फिरणारा आवाज, तानांची हळुवार सुरावट. संत कान्होपात्रेच्या आळवणीला गंधर्वसुराचा परीसस्पर्श. बालगंधर्वांच्या गलितगात्र अवस्थेतील त्या करुण भजनातील शब्दांनी वरिष्ठांना त्यांच्या गतवैभवाची आठवण येऊन भडभडून आले. त्यांची दीन स्वरांजली, प्रत्यक्ष दर्शन आणि भजनातील काव्यविलास. कान, लोचन अणि मनाने स्तब्धपणे अनुभवलेले ते क्षण आंतरिक अनुभूति देऊन गेले.....

चित्रपटातून बालगंधर्वांच्या वैभवशाली नाट्यरंपरेची, शरीर सौष्ठवाची व स्वरगंगेची झलक अनुभवली... आणि आठवणींना उजाळा मिळाला.



# भावे काकूंचा डब्बा

आनंद भातखंडे

आयुष्यात काही आठवणी सिमेंट काँक्रीटच्या घराप्रमाणे पक्क्या राहतात. त्या आठवणींशी निगडीत असलेल्या प्रसंगामुळे, स्थळ काळामुळे किंवा व्यक्तींमुळे त्यांचा तजेला, टवटवीतपणा वर्षानुवर्षे तसाच टिकून असतो. काळाच्या ओघात जपून ठेवलेल्या अश्या आठवणींना माळेतील मोत्यांची सर असते. माळ जरी निखळली तरी ते मोती जपून ठेवले जातात .... अनंत काळासाठी.
माझ्या लहानपणी आम्ही एका चाळवजा इमारती मध्ये पहिल्या मजल्यावर रहात होतो. एका सामाईक बाल्कनीत सगळ्या भाडेकरूंचे प्रवेशद्वार उघडायचे. शेजार-पाजाऱ्यांचे दरवाजे कारणाशिवाय बंद नसल्यामुळे आम्हां पोराटोरांचा मुक्त संचार असायचा. तळ मजल्यावर एका छोट्या खोलीत भावे काकू राहायच्या. घरात त्यांच्या बरोबर, कॉलेजमध्ये शिकणारा माधव आणि दहावीत शिकणारी मीरा, असे तिकोणी कुटुंब होते. पतीचे अकाली निधन झाल्यामुळे संसाराची सगळी जबाबदारी भावे काकुंवर पडली. त्यांच्याकडे काही वैयक्तिक कारणामुळे विशेष नातेवाईक पण यायचे नाहीत. त्यामुळे सगळी चाळ हेच त्यांचे नातेवाईक होते. स्वयंपाक, शिवणकाम आदी छोटे छोटे उद्योग करून काकू घर चालवत होत्या. माधव सकाळी वर्तमानपत्र टाकायचा आणि संध्याकाळी एका वाचनालयात काम करून घरखर्चाला हातभार लावायचा. मीरा पण त्यांना घरकामात मदत करायची. एखाद्या कृष्णधवल मराठी चित्रपटात शोभेल असे ते कुटुंब होते.
काकू प्रेमळ आणि मनमिळावू होत्या. त्यांचे कधी कुणाशी वादविवाद झाल्याचे स्मरत नाही. उलट त्याच इतरांच्या घरातील भांडणे सोडवायच्या, कधी सासूच्या हक्काने, कधी आईच्या मायेने, तर कधी बहिणीच्या समजुतीने. शाळेत जाताना त्यांच्या मंजुळ आवाजातील भजनं, भूपाळ्या ऐकताना आमच्या दिवसाची सुरुवात पवित्र आणि मंगलमय व्हायची. देवतार्चन आणि अध्यात्मिक पुस्तकांचे वाचन हा त्यांचा फावल्यावेळात चालणारा नित्यक्रम होता. काकूंचं कृष्णावर विशेष प्रेम. दुपारच्या वेळी त्या आम्हाला सगळ्यांना जमवून देवाधर्माच्या, पुराणातील गोष्टी सांगायच्या.

गोष्ट सांगून झाली की त्या सगळ्यांना गोल चकतीच्या आकाराच्या पांढऱ्या पेपरमिंटच्या गोळ्या द्यायच्या. त्या गोळ्यांकरीता का होईना आम्ही कधी कधी त्या अगम्य वाटणाऱ्या गोष्टी ऐकण्यासाठी बसायचो. कृष्णजन्म, कालियामर्दन तर इतकं खुलवून सांगायच्या की आम्ही सगळे बालगोपाळ आहोत आणि चाळ हेच आमचे गोकुळ अश्या अविर्भावात वावरायचो. चाळीत शांतता असेल तर समजावे, भावे काकूंचा बालसत्संग चालू आहे. आपलं कार्टे भावे काकूंकडे आहे हे कळल्यावर प्रत्येक आई निश्चिंत असायची. त्यांच्या घरात कधी भांडणे नाहीत वादविवाद नाहीत. घरात कर्ता पुरुष नसताना असेल त्या बेताच्या परिस्थितीत सुद्धा सुखात नांदणारे ते कुटुंब माझ्यासाठी आदर्श होते.
काकूंच्या स्वभावामुळे आणि त्यांच्या परिस्थितीमुळे सगळे चाळकरी सदैव मदतीला तयार असायचे. कधीकधी काही कामासाठी काकू बाहेरगावी गेल्या तर कुठल्या ना कुठल्या घरातून मीरा आणि माधव करता डबा यायचा. आमच्या घरीतर काही गोडधोड केलं तरी ते एका डब्यात घालून तो भावे काकूना देण्यासाठी आई मला पिटाळायची. आईने इतरांना देण्यासाठी काही खास प्लास्टीकचे डब्बे ठेवले आहेत. उद्देश एकच "परत नाही आला तरी पंचाईत नाही". असंच एकदा बाजूला कुणाला तरी काही द्यायचे होते आणि आई "ठेवणीतील" डब्बे शोधत होती. पण बरेच डब्बे गायब होते. शोधता शोधता ती स्वतःशीच बडबडत होती 'आजकाल या भावे काकू लवकर डब्बे आणूनच देत नाहीत. पुढच्या वेळेस त्यांना सांगेन डब्यातलं काढून घ्या आणि लगेच डब्बा परत द्या.' पण ते तसं कधीच होत नाही हा मुद्दा वेगळा. मला माहित होतं की आई आता मला भावे काकूंकडे डब्बे आणायला पाठवणार त्यामुळे मी तिच्या आज्ञेची वाटच बघत होतो .... आणि तितक्यात आज्ञा आली ... "नुसताच बसला असशील तर जरा भावे काकूंकडून आपले २ डब्बे तरी घेऊन ये. काय करतात स्वतःकडे ठेवून घेऊन कोण जाणे". मी धावत पळत काकूंकडे गेलो आणि दरवाज्यातूनच आरोळी ठोकली "काकू ऽऽऽऽऽऽऽऽऽऽ डब्बे." काहीतरी कामात असलेल्या काकू पदराला हात पुसत बाहेर आल्या आणि म्हणाल्या "अरे हो, सविताचे ५-६ डब्बे माझ्याकडे आहेत. रोज देईन म्हणते पण जमत नाही. डब्यात द्यायला काही नाही ना. आत्ता काहीतरी तुझ्या आवडीचं करत आहे ते घालून संध्याकाळी देते" आतून मस्त चिवड्याचा वास येत होता. त्या वासाच्या अंमलाखाली मूळ निरोप विसरण्याआधी तो सांगितलेला बरा. "काकू किमान २ डब्बे तरी घेऊन येच अशी आज्ञा आहे मातोश्रींची". "बरं २ आत्ता देते आणि बाकीचे मग संध्याकाळी आणून देईन" असं म्हणून काकू डब्बे आणण्याकरिता आत गेल्या. दोन डब्यात थोडी साखर घालून माझी बोळवण केली. चिवड्याच्या वासापुढे माझा पाय हलत नव्हता. तितक्यात पहिल्या मजल्या वरून रणांगणात वापरल्या जाणाऱ्या शंखादी वाद्यांचा कडकडाट झाला आणि मी पुढील संकटाची चाहूल लागल्यामुळे वर जायला धूम ठोकली. आईच्या हातात डब्बे दिले. "हे काय दोनच? बाकीचे तीन?" मातोश्री वदल्या. मी म्हटलं "तुला दोनच हवे होते ना?

काकू बाकीचे तीन संध्याकाळी आणून देतील". दोन्ही डब्ब्यात दिलेली साखर बघून आई म्हणाली "कधीच रिकामे डब्बे देत नाहीत. काही ना काही तरी देतातच". चिवड्याचा वास अजूनही मेंदू मध्ये भिनला असल्याने मी म्हणालो " थांब, संध्याकाळी घरी डब्ब्यांतून चिवडा मिळणार आहे." आई:"तुला कसं माहीत". मी म्हटलं "काकू चिवडा करत होत्या. छान वास सुटला होता" "तरीच तुला एवढा वेळ लागला. हावरटासारखा मागितला नाहीस ना त्यांच्याकडे?" आईची त्रासिक मुद्रा. मी पण तितक्याच त्रासिक चेहऱ्याने, "त्या देणार म्हटल्यावर मी कशाला मागू?" संध्याकाळी काकू डब्बे घेऊन घरी आल्या. मी चिवडा मिळणार म्हणून त्यांच्या अवतीभवती घुटमळत होतो. माझी ती चलबिचल बघून त्या म्हणाल्या "आणलाय बरं का चिवडा माझ्या कान्हासाठी" आम्ही सगळीच पोरं त्यांच्यासाठी कृष्णरूप होतो. त्यामुळे कधी त्या आम्हाला कान्हा म्हणत तर कधी मुकुंदा म्हणत. खऱ्या नावाने कधीच काकूंनी हाक मारली नाही. आईने डब्बे आत नेऊन ठेवले तितक्यात काकू आईला म्हणाल्या "त्याला चिवडा दे गं, सकाळ पासून कळ धरून आहे बिचारा". सकाळच्या आईच्या वाक्याचे मला खूप कुतूहल होते. आम्ही दिलेल्या डब्यात काकू काही ना काही तरी घालून देतातच ते का? कसलीही भीड न ठेवता मी काकूंना त्याच्या बद्दल विचारलं. काकूंच्या चेहऱ्यावर मंद हास्य होतं. त्या म्हणाल्या "सहजच रे. असं खास कारण काही नाही. कुणाला रिक्त हाताने पाठवू नये अशी आपली शिकवण सांगते. म्हणून मी कधीच रिकामा डब्बा देत नाही. कृष्णाला तू काही जरी दिलेस तरी तो डब्बा भरभरून तुला देईल, विसरलास ती कृष्ण सुदाम्याची गोष्ट" आईने मला चिवडा आणून दिला तरीपण काकूंचं संतवचन माझी पाठ सोडायला तयार नव्हतं.

इतक्या सध्या गोष्टीची देव आणि भक्ताचे नाते यात घातलेली सांगड मला त्या वयात अगम्य वाटली. कसला डब्बा?? त्यात मला कृष्ण काय देणार?? पण पुढे पुढे त्याचा उलगडा होत गेला. अगदी जीवनाचं रहस्य समजल्या सारखा. भगवंताकडून काही इच्छा असेल किंवा त्याने आपल्या करता काही करावे अशी अपेक्षा असेल तर त्याला "भक्ती"रूपी डब्बा द्यावाच लागतो तरच तुम्हाला त्या डब्ब्यातून देव सुखसमृद्धीची उधळण करतो. काकुंच्या बोलण्याचे हेच सार मी कायम डोक्यात ठेवले. कालांतराने आम्ही त्या चाळीपासून थोड्याच अंतरावर नवीन घरी राहायला गेलो आणि चाळ संस्कृतीशी असलेली नाळ कायमची तुटली. काकू अधूनमधून दिसायच्या, गोविंदा अशी हाक मारून विचारपूस करायच्या. घरी येत जा असा आग्रह पण करायच्या. पण वेळ काय आपल्या हातात असते?

असाच काळ लोटला. माझं शिक्षण पूर्ण झालं. चांगली नोकरी पण मिळाली. कंपनीने सगळं काही दिलं. सुख पायाशी लोळण घेत होती. कंपनीने राहायला मोठी जागा दिली, फिरायला गाडी दिली. माझ्या प्रगतीवर आई बाबा खुश होते. आणि आता तर लग्न ठरले होते. मनासारखी बायको पण मिळणार होती.

बाबांनी विचारले की “तुझे कुणी स्पेशल गेस्ट येणार आहेत का?” मी म्हटलं “हो, मला एकच पत्रिका द्या. बाकी तुम्ही बघून घ्या कुणाला बोलवायचे ते” माझ्या हस्ताक्षराने त्या पत्रिकेवर लिहिलं “भावे काकू आणि परिवार”. माधव दादा अजूनही संपर्कात होता. त्याला फोन करून त्याच्या घरी गेलो. आता त्याच चाळीच्या जागी अलिशान इमारत उभी आहे आणि तिथेच माधव दादाने स्वकर्तृत्वावर ४ खोल्यांचा ब्लॉक घेतला. माधव दादा आपल्या पत्नी सोबत काकूंची खूप चांगली काळजी घेत होता. मीरा ताईचे पण लग्न झाले होते. आपल्या नातवंडाना आता कृष्णाच्या गोष्टी सांगून काकू आपली हौस पूर्ण करून घ्यायच्या. कृष्णा ने त्यांच्या डब्यात भरभरून सगळं दिलं अगदी कधीही रितं न होण्या सारखं.

दरवाजा उघडताच काकूंनी विचारलं “कोण आलाय गं?”. मी म्हटलं “यशोदामाई तुझा कान्हा आलाय गं”. भावे काकूंच्या पाया पडलो आणि त्यांच्या शेजारी बसलो. काकूंनी मायेने पाठीवरून हात फिरवला. “इतका मोठा झालास तरी काकूला नाही विसरलास. बरं वाटलं आलास ते. मी आजकाल कुठे बाहेर नाही पडत. माधव कधी कधी गाडीतून फिरायला घेऊन जातो इतकंच” जुन्या आठवणीना उजाळा देऊन झालं, सगळ्यांची ख्याली खुशाली घेऊन झाली. काकूंना म्हटलं “काकू, पुढच्या महिन्यात तुमचा कान्हा लग्न करतोय. त्याला त्याची रुक्मिणी मिळालीये. तुम्हाला बोलावणे करायला आलोय. गाडी पाठवून देईन. तुम्ही सगळे आवर्जून या आणि मीरा ताईला पण सांगा.” काकू सुनेला म्हणाल्या “माझ्या गोविंदाला चिवडा आण गं. आणि मग चिमुटभर साखर पण आण” काकूंच्या हातात निमंत्रण पत्रिका दिली. त्यांच्या पायावर डोके टेकवून तिथेच पायाशी बसलो. काकू मंदपणे हसत होत्या. तेच हास्य जे कैक वर्षांपूर्वी माझा प्रश्न ऐकून उमटलेलं. काकूंनी त्यांचा कापरा हात माझ्या डोक्यावर ठेवला आणि म्हणाल्या “कृष्णाने डब्बा भरून दिला ना?” आणि दोघांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.



# त्याने मला तीन वेळा स्पर्श केला पण..

अनघा हिरे

त्या दिवसांची गोष्ट आहे जेव्हा मी आयुष्याच्या सर्वात सुंदर दिवसांमध्ये जगत होते. माझे नुकतेच लग्न झाले होते .त्या सुंदर दिवसांनी माझे मन मोहरून गेले होते, मी माझ्याच आनंदात सगळ जग माझ्याच मुठीत आणि मी जगातली सर्वात आनंदी ,खुश व्यक्ती अश्या ह्या आनंदाच्या दिवसात आम्ही हनिमून साठी माथेरान ला गेलो होतो. जे हवं होतं ते सगळ मिळत होतं. माझं आवडतं माणूस आणि खूप वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आता त्याचा सहवास सारे काही स्वप्नवत भासत होते. पण....

माथेरानचा पावसाळा. दूर दूर घनदाट झाडी, पक्ष्यांचा आवाज, माकडांची चीं-चीं, तासंतास फिरूनसुद्धा मिळणारा एकांत हे सगळे वातावरण बघून मी जरा घाबरूनच गेले. पहिल्या दिवशीच मी माथेरानचा खूप धसका घेतला. हा एकांत, ही शांतता मनाला नकोनकोशी झालेली. त्यात पहिल्या दिवशीच आम्ही रात्रीचे जंगलात हरवलो. सतत मुसळधार पाऊस, किर्र अंधार. पायाखालून रस्ता जातोय कि अजून काही, काहीच समजत नव्हते. वाट फुटेल तिथे आम्ही जात होतो दूरवर कुठेतरी एखादा छोटासा लाईट दिसायचा पण थोड्या वेळाने तो पण दिसेनासा व्हायचा. कसे बसे आम्ही रेल्वेचे रूळ शोधून काढले आणि अंधाऱ्या रात्री रेल्वेच्या रुळावरून आमचा प्रवास सुरु झाला. आम्ही आमचे mtdc चे हॉटेल शोधून काढले. ती रात्र मी खूप भीतीत घालवली .सकाळी सकाळी मी अतुलच्या (माझ्या नवऱ्याच्या)मागे लागली कि मला इथे राहायचेच नाही चला आपण नाशिकला

.

परत जाऊ .पण अतुलला माझे काहीच ऐकायचे नव्हते. मग आपण किमान मार्केटमध्ये तरी जाऊन राहू. जंगलातल्या एकांतापेक्षा मला मार्केटमधला गजबजाट जास्त आवडला. म्हणून मार्केटमधल्या गजबजाटात आम्ही रूम घेतली . रूम तर मार्केट मध्ये घेतली, पण माथेरानचे प्रेक्षणीय स्थळ बघण्यासाठी आम्ही बरेच लांब लांब फिरायला जायचो. एकदा असेच आम्ही फिरता फिरता खूप लांब वर कधी पोहोचलो हे समजलेच नाही. आम्ही परत रस्ता चुकलो . तासनतास चालत राहिलो ,रस्ता शोधत राहिलो. पण काहीच नाही. रस्त्याने एक मनुष्य पण बघायला मिळत नव्हता. सतत वेगवेगळ्या रस्त्याने जात होतो परत फिरून फिरून तिथेच येत होतो अचानक मला खूप लोकांचा आवाज आला, मला खूप आनंद झाला. 'अतुल चल आपण त्या आवाजाच्या दिशेने जाऊ.' माझी खूप घाई चालू झाली. अतुल पण माझ्या बरोबरीने येतच होते. त्या खूप साऱ्या लोकांना बघून मला फार आनंद झाला. इतका वेळ भटकल्या नंतर एवढे सारे लोक बघायला मिळताच, आम्हाला फार बरे वाटले आता त्या लोकांजवळ जावे आणि त्यांना रस्ता विचारून रूमवर जावे एवढंच ठरवलं होतं . आम्ही त्या लोकांजवळ जाऊ लागलो .ते लोक काहीतरी काम करत होते त्यांच्या हातात मोठे मोठे दोर कुऱ्हाडी होत्या काही जण ते दोर झाडाला बांधून ओढत होते. नीट बघितल्यावर लक्षात आले ते सगळे झाड कापत होते. आम्ही तिथेच त्यांची गंमत बघत होतो थोडा वेळ आता इथेच थांबायचे. कारण खूप वेळापासून आम्ही कोणालाच बघितले नव्हते. अचानक त्या लोकांच्याहातून तो दोर सटकला आणि एकच गोंगाट सुरु झाला. सगळे जण जोर जोरात आरडा ओरडा करू लागले ज्याची कोणालाच शक्यता वाटत नव्हती तेच झाले. झाडाची भल्ली मोठी जाडजूड फांदी ज्या दिशेला पाडण्यासाठी त्यांनी पकडली होती त्याच्या विरुद्ध दिशेला येऊन ती पडत होती. अतुल पळत येत होते त्यांनी मला खेचतच लांब नेले आणि क्षणातच मी जिथे उभी होती तिथे ती जाडजूड फांदी येऊन पडली. माझ्या छातीत धस्स झाले. काय होणार होते त्या क्षणाला? नंतर मला काहीच समजत नव्हते माझ्या अवती भवती लोक उभे होते, सगळेजण माझ्याशी काहीतरी बोलत होते आणि माझ्या कानात कोणाचेच शब्द जात नव्हते. चार दिवसच झाले होते माझ्या लग्नाला आणि आज हा प्रसंग......... तो आला होता त्याने मला स्पर्श करायचा प्रयत्न केला होता पण .............

अशीच काही वर्षां पूर्वीची गोष्ट मी आजारी होती . आराम करण्यासाठी डॉक्टरांनी मला फार झोप येईल अशी औषधे दिली होती .उन्हाळ्याची दुपार होती गरमीने मी त्रासलेली होती. त्यामुळे मी पंख्या खालीच उशी टाकून झोपली होती. गुंगीच्या औषधा मूळे झोप अनावर झालेली संध्याकाळ होत आलेली तरीही मी उठू शकत नव्हती. अतुलनी मला बळजबरी उठवले. त्यांना चहा हवा होता. मला उठणे शक्य नव्हते आणि अतुलला स्वतः चहा करणे हि शक्य नव्हते. कारण अतुलचा पाय प्लास्टर मध्ये होता. मलाच जावे लागणार होते. 'थोडा वेळाने उठू का? ' मी अतुलला विचारले पण नाही 'तू दोन सेकंदात उठली पाहिजे अतुल ने मला ऑर्डर दिली

मी कशी बशी उठली, किचनपर्यंत जात नाही तोच मी जिथे उशी टाकून झोपली होती तिथेच धाड्कन पंखा येऊन पडला. हाय !! हे काय झाले !!! माझ्या डोळ्यांवरची झोप खाडकन उडाली. पुन्हा तो आला होता आणि त्याने पुन्हा मला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला होता. पण ह्या वेळेस सुद्धा............

माझ्या आयुष्यातला हा तिसरा प्रसंग. मला ज्या गोष्टीची भीती वाटायची त्या गोष्टीची माझ्या मनात आता दहशत निर्माण झाली होती. मागच्या वर्षीच्या पावसाने आमच्या नाशिकला तर सगळीकडेच हाहाकार माजवला. आमच्या बिल्डींगचा एक मजला पाण्यात बुडला. आमच्या दोन चाकी गाड्या वाहून गेल्या. आमची मारुती कार पूर्णपणे पाण्यात बुडालेली होती. रात्री खूप उशीरा पुराचे पाणी ओसरले. दुसऱ्या दिवसाची सकाळ सर्व घाण, चिखल आवरण्यात जात होती. सगळीकडे साफ सफाईचे काम सुरु झाले. मी पण घराच्या बाहेर साफसफाई करायला गेले. खूप लांबवर कुठेतरी वाहून गेलेली माझी स्कुटी शोधून आणली .तिला स्वच्छ केली. नंतर मारुती कार स्वच्छ करायला घेतली. मी एकटीच गाडी साफ करत बसली. गाडीचे दरवाजे उघडले , गाडीतला सर्व चिखल धुवून काढला ,गाडीत वाहून आलेली अडकून बसलेल्या वेली मी हात घालून स्वच्छ करत होती .त्या क्षणाला काही समजलेच नाही. डोक्यात एकच होते ही गाडी सगळी स्वच्छ करायची. अचानक अतुल हाक मारू लागले ,"अनघा लवकर वर ये मला खूप भूक लागलीय नाश्ता करून दे." "थांबा जरा आता फक्त बॉनेटच साफ करायचे राहिलेय ते करते आणि येतेच ." पण नाही... "तू दोन मिनिटात वर ये, बॉनेट साफ नको करू." अतुलची परत ओर्डर तितक्यात आमच्या ऑफिसचा ऑफिसबॉय तिथे आला, " बाईसाहेब , तुम्ही जा वर मी करतो हे साफ.

तो एकदम आदबीने बोलला. बरं म्हणून मी गाडी कडे पाठ फिरवली. आणि त्याने बॉनेट उघडले. बस! बॉनेटमधून एक भला मोठा नाग फणा काढून डंख मारण्याच्या तयारीत उभा, नागाला बघून माझ्या तर पाया खालची जमीनच सरकली. आता अतुल स्वतःच खाली आले मला सावरायला. तिन्ही वेळेस तो यायचा प्रयत्न करत होता पण तिन्ही वेळेस माझ्या सोबत अतुल होते मला सावरायला .....

"



# आठवणीतली तीन मोरपिसं

श्रीपाद पु. कुलकर्णी

*कळायला लागल्यापासुनचे जीवनातले महत्वाचे टप्पे सांगायचे म्हंटलं म्हणजे शाळा कॉलेजमधल्या धुंद तसेच बेचैन करणाऱ्या आठवणींचं मोहोळ उठल्यासारखं होतं.*
*प्राथमिक शाळेत एका खास बालमैत्रिणीसंगे राजा-राणीसारखं अख्ख्या शाळेवर अधिराज्य गाजवण्यासारखा केलेला बालिशपणा; माध्यमिक शाळेत गेल्यावर मागच्या बाकावर बसायला लागलं म्हणून आलेला हिरमुसलेपणा घालवताना, मोकळ्या तासाला अख्खं बालनाटक 'एकपात्री' करून दाखवण्याचा घेतलेला मोकळेपणा; उच्चमाध्यमिक इयत्तेत कॉलेजमध्ये जायला मिळाल्यावर, आजवर कधी चहाच्या कपाला स्पर्श न केलेला मी  कॉलेजबाहेरच्या टपरीवर काचेच्या ग्लासमधून मित्रांबरोबर चहा घेताना वागण्या-बोलण्यात अचानक आलेला बिनधास्तपणा हे सारं सारं आठवताना गुदगुल्या होतात मनाला. त्याचवेळी शाळा कॉलेजात भेटलेले शिक्षक, त्यांच्याशी असलेले मित्रासारखे जिव्हाळ्याचे संबंध, ब्राह्मण मुंजा म्हणून त्यांच्याकडे जेवायला जाण्याचं अप्रूप, दहावीला मराठीच्या शिक्षकांनी संपकाळात आपल्या घरी भरवलेले आमचे वर्ग अशा आठवणींनी अजूनही ऊर भरून येतो आणि असे शिक्षक काळाच्या पडद्याआड केव्हा निघून गेले ते कळलंही नाही म्हणून डोळेही भरून येतात.*
*पदवी, मग पदव्युत्तर 'सनदी लेखापाल' असं बिरुद लावण्याचं भाग्य लाभलेला मी व्यवहारी जगाच्या जंजाळात असा काही गुरफटलो गेलो की कधीकाळी आपण मराठी साहित्यिकांच्या पुस्तकांवर तुटून पडायचो, कवितांच्या भावविश्वात हरवून जायचो याचीही आठवण राहिनाशी झाली. खातेकुंडली मांडून घ्यायला येणाऱ्या गब्बर व्यापाऱ्यांनी लाखो करोडो रुपयांच्या आकड्यांत खेळायचं आणि फक्त त्यांचे ते 'आकडे मोडून' आपण खायचे एव्हढंच हाती राहिलं.*
*खरं सांगतो, या विचारानं येणारी मरगळ झटकायला फक्त एकच उपाय आहे आणि तो म्हणजे माझ्या संग्रही असलेली ती तीन मोरपिसं काढून पुन्हा पुन्हा बघणं. एक 'नाच रे मोरा'सारखं कायम टवटवीत, दुसरं धाग्याधाग्यांसारखं विशविशीत झालेलं असलं तरी मनाला मुलायम स्पर्श देणारं आणि तिसरं आपल्या डोळयांतून भरभरुन बोलणारं. ही मोरपिसं म्हणजे तीन दिग्गजांची मला आलेली पत्रं.*

पहिलं महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व 'पु.ल.देशपांडे' यांचं, दुसर पत्रं साहित्यिकांतले संवेदनशील 'पार्टनर' 'व.पु.काळे' यांच्याकडून अनपेक्षितपणे आलेलं आणि तिसरं सुप्रसिद्ध गीतकार आणि कविवर्य पी.सावळाराम यांचं.

पु.लं.ना मी पत्र पाठवलं होतं ते वाढदिवसाच्या शुभेच्छांचं १९७९ सालचं ८ नोव्हेंबरचं निमित्त साधून. पण त्या शुभेच्छांमध्ये मी भागीदार केलं होतं 'बटाट्याच्या चाळी'ला. चाळीचे सांस्कृतिक सचिव राघुनाना सोमण यांनी ''बटाट्याच्या चाळी'नं पु.लं.चा वाढदिवस कसा साजरा केला याचा सारा कार्यक्रम पु.लं.च्याच शैलीत पत्राद्वारे कळवल्याची ती कल्पना होती. त्यासाठी बटाट्याच्या चाळीचं नीट वाचन करून त्यातली पात्रं वापरून तयार केलेलं ते पत्र (लहान तोंडी मोठा घासच होता तो कॉलेजच्या पहिल्या वर्षातला) पाठवलं होतं माझ्या शुभेच्छापत्राबरोबरच.

'बटाट्याच्या चाळी'च्या त्या पत्रातले मुद्दे अजुनही आपण किती आगाऊपणा केला होता या विचारानं हैराण करतात. भ्रमणमंडळ पुण्याला गेलं पण प्रेमाचं प्रतीक म्हणून द्यायचा आहेर मात्र चाळीतच राहिल्यानं तसंच परत आलं. गच्ची कुणाची हा प्रश्न आता राहिला नसल्यानं ८ नोव्हेंबरला पु.लं.च्या एकसष्टीचे कार्यक्रम त्या गच्चीवर कसे आणि काय काय साजरे करण्यात आले ते अनुक्रमे दिले.

पहिल्यांदा एकसष्ट बालक बालिकांनी कोचरेकर मास्तरांच्या अधिपत्याखाली पु.ल्.वंदना सादर केली. बाबुराव खरेंनी शिवाजीची कथा सांगण्याच्या आवेशात पु.लं.बद्दल माहिती सांगितली. या इतिहासकथनाचा परिणाम म्हणून दहा युगुलांनी रजिस्टर्ड मॅरेज करण्याची शपथ घेतली.

नंतर गानकोकिळा वरदाबाई हट्टंगडींनी 'क्षण आला भाग्याचा' हे आळवून आळवून म्हंटलं. मग कवयित्री डॉ.सौ.काव्यकलाबाई कोरकेंनी पु.लंच्या गुणगौरवपर कविता सादर केली. चाळीचे परंपरागत संगीतकार एच्च्.मंगेशराव यांनी 'जियो हजारो साल' हे पेटीवर वाजवलं. नंतर नाट्यभैरव कुशाभाऊ अक्षीकर यांनी बसवलेलं 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक झालं.

त्यावर पडदा पडताच सुवासिनींनी पु.लं.च्या तैलचित्राला ओवाळलं आणि पु.लंच्या जयघोषानं चाळ दुमदुमुन गेली. पण तेव्हढ्यात पु.ल. स्वतः आल्याची अफवा उठली आणि पांगापांग होऊन गच्ची रिकामी झाली. यात राघूनाना हे लिहायला विसरले नाहीत की 'आपल्या सुक्ष्म निरिक्षणशक्तिचा धसका चाळकऱ्यांनी घेतलाय असा गैरसमज करून घेऊ नये.'

कितीतरी चाहत्यांच्या पत्रांमध्ये आपल्या या पत्राला काय प्रतिसाद मिळणार या माझ्या विचारातुन भानावर आणलं ते पु.लं.च्या उत्तरानं. इतर अनेक चाहत्यांच्या शुभेच्छांना दिलेल्या छापील 'धन्यवादा'नंतर पु.लं.नी स्वहस्ताक्षरात पुढे तीन चार वाक्य लिहिली होती खास माझ्यासाठी अगदी मोजक्या पण चपखल शब्दांत.

"बटाट्याच्या चाळीने केलेल्या माझ्या 'षष्ठीचे' वर्णन मस्त आहे. उद्याचा एक फार चांगला विनोदी लेखक मला त्यात दिसला. कॉमर्सचे विद्यार्थी आहात म्हणून सांगतो विनोदी लेखन अव्यापारेषु व्यापार म्हणून सोडून देऊ नका. लिहित जा. तुम्हाला हे यटाक नक्की जमेल."
"तुमचा
पु.ल.देशपांडे.""
तीच ती प्रसिद्ध स्वाक्षरी."
मला वाटतं गद्यात पु.लं.ना आणि पद्यात ग.दि.मां.ना इतके चपखल शब्द कसे गवसत असतील हे कोडं या जगाच्या अंतापर्यंत तरी सुटणं अशक्य आहे.
तर ते पु.लं.चं आलेलं पत्र हातात घेऊन मी माझ्या शाळेतल्या मराठीच्या शिक्षकांकडे धावलो. कुठे ठेवू कुठे नको असं होऊन गेलं. कॉलेजच्या प्राध्यापकांनी नियतकालिकात माझं आणि पु.लं.चं पत्र छापलं तेव्हा आनंद गगनात मावेना.

पुढे मग साहित्यिक गप्पा, भाषणं यांना जाऊ लागलो. वाचनरंगी रंगू लागलो वगैरे वगैरे. पण पु.लं.ना दिसलेला विनोदी लेखक आकडेमोडीतच हरवून गेला त्याची खंत टोचत टोचतच उदरनिर्वाहाचा व्यापार चालू राहिला. २००८ मध्ये मात्र थोडीशी उसंत मिळू लागल्यावर लेखणीनं उचल खाल्ली आणि त्यानंतर २०११ पर्यंत एक डझनभर तरी विनोदी लेख / कथा लिहिल्या गेल्या आणि दैनिकाच्या रविवार पुरवणीत म्हणा किंवा मासिक / दिवाळी अंकात म्हणा प्रसिद्ध झाल्या. म्हंटलं पु.लं.च्या शब्दांचा एक हजारांश तरी आपण मान राखला असेल. या विचारानं मनाची टोचणी थोडीशी कमी झालीय.

एक मात्र खरं की  प्रथितयश लेखकांच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकांच्या मनात कायम एक औत्सुक्य असतं. १९८३ साली कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना अशाच उत्सुकतेपोटी 'वपुं'ना (व.पु.काळे) पत्र लिहिलं. निमित्त असं झालं की, 'मॅजेस्टिक गप्पां'मधे ते आले असताना प्रचंड गर्दीमध्ये त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांची स्वाक्षरी घेणं मला जमलं नाही. मग पत्र लिहिलं. तारुण्यसुलभ धुंदीत त्यांच्या दिमाखदार पुस्तक प्रकाशन सोहळ्यांबद्दल छेडण्याचा त्यांनी लेखनात रंगवलेली नाजूक प्रकरणं स्वानुभवांवर आधारीत आहेत का..वगैरे विचारण्याचा आगाऊपणा केलेलं ते पत्र मी पाठवलंसुद्धा! सोबत माझा पत्ता लिहिलेलं कोरं आंतर्देशीय पत्र जोडायला विसरलो नाही.

उत्तरादाखल 'काही बोलायाचे नाही' अशा पद्धतीचं फक्त त्यांची कलात्मक बाकदार स्वाक्षरी केलेलं ते कोरंच आंतर्देशीय पत्र आलं. मी खजिल झालो. म्हंटलं, बरी अद्दल घडली आपल्या शहाणपणाची! त्यांना पुन्हा पत्र लिहिलं. म्हंटलं,"तुमचं 'वपुर्झा' वाचलं आणि साऱ्या प्रश्नांची उत्तरं मिळाली."

त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण, व्यवसाय शिक्षण वगैरे पार पाडून मी नोकरीला लागलो जमेल तेव्हा संग्रही असलेली वपुंची आणि इतर साहित्यिकांची पुस्तकं वाचणं चालू होतंच.

१९८९ साली अचानक एक दिवस एक अनपेक्षित पत्र येऊन थडकलं. पत्रलेखकाचं नाव वाचून झालेलं आनंदमिश्रित आश्चर्य अवर्णनीयच ! नीटनेटका पत्ता लिहिलेलं आणि रेखीवपणे पोस्टाचं तिकीट लावलेलं ते हिरव्या रंगाचं पाकीट फोडलं. आत खुद्द 'वपुं'च्या सुरेख हस्ताक्षरातलं पत्र. हृदयाचा ठोका चुकवणाऱ्या त्या सात-आठ ओळी वाचायला मी तब्बल अर्धा दिवस लावला असेन.

असं काय होतं त्या पत्रात ?

"प्रिय कुलकर्णी,

१९८३ सालातलं तुमचं पत्र आत्ता माझ्यासमोर.

रात्रीचे २//.

BRAIN TUMOR ची आठनऊ ऑपरेशन्स झालेली सौभाग्यवती कधीनवत शांत झोपली आहे.

तिच्या काळजीनं मी झोप हरवलेला.

विरंगुळा म्हणून जुन्या आणि आवडलेल्या वाचकांच्या पत्रांना पुनः पत्रं लिहित बसलोय.

त्यात तुम्ही.

कसे आहात ?

याखाली 'Hello !' म्हणणाऱ्या छोट्याशा कार्टुनचा स्टीकर लावलेला. त्याखाली तीच ती पल्लेदार स्वाक्षरी आणि त्याखाली '२८३१९८९' अशी तारीख.

माझ्या संग्रही असलेल्या 'वपुं'च्या पुस्तकांची पारायणं तर होतातच, पण त्याचबरोबर, त्यावेळी मनात अनेक भावनांचा कल्लोळ माजवलेल्या या हृदयस्पर्शी पत्राचंही.

प्रथितयश, आपल्या लडिवाळ भावगीतांनी रेडिओच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेल्या कविवर्य, कै.पी.सावळाराम (सावळाराम रावजी पाटील) यांच्या पत्राची आठवण आवर्जून व्हावी आणि सांगावी असंच आजचं साहित्यिक वातावरण आहे असं म्हंटलं तर वावगं ठरू नये. मराठी साहित्य संमेलनाच्या निवडणुकाही राजकारणाच्या आखाड्यासारख्या वाजूगाजू लागल्या आहेत. प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची संख्या, गाजवलेल्या साहित्यिक परिसंवादांची आकडेवारी, साहित्यिक वर्तुळातील उठबस, लोकसंग्रह यावर आधारलेली गणितं संमेलनाध्यक्ष पदासाठीची लायकी ठरवतात हे आजचं चित्र आहे. ग्रंथनिर्मिती आणि त्यांचं वितरण यांची यथायोग्य यंत्रणा, लोकांपर्यंत आपली कला पोहोचवणारी मोठ्या प्रमाणात अन सहज उपलब्ध होणारी रेडिओ-टिव्ही सारखी प्रसारमाध्यमं यांमुळे कवी-लेखक लवकरात लवकर रसिकांपर्यंत आपली कलाकृति पोहोचवण्यात यशस्वी होतात.

पण प्रकाशित ग्रंथांपेक्षा, कथाकथन, मालिकांचं संवादलेखन, मालिका आणि चित्रपटांसाठी गीतलेखन यातुन अशा कलाकारांना रसिक-प्रेक्षकांपर्यंत लवकर पोहोचता येतं.

गंमत म्हणजे १९८३ सालच्या मे महिन्यात मला पाठवलेल्या एका मोठ्या पत्रात एका पी.सावळाराम यांनी हेच सत्य लिहिलं होतं. त्यांनी लिहिलं होतं,
"मी आणि गदिमा (गीतरामायणकार कै.ग.दि.माडगुळकर) हातात हात घालून कोल्हापुराहून चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यासाठी निघालो. गदिमा पुण्यातच थांबले. मी मुंबईच्या रोखाने येऊन ठाण्यास थांबलो आणि मोठ्या उत्साहानं, प्रेमानं गीतलेखन - चित्रपटासाठी, ध्वनिमुद्रिकेसाठी व आकाशवाणीसाठी - करू लागलो. आम्ही ग्रंथसंपदा निर्माण करण्याच्या मागे न लागता रसिकांच्या जवळ वरील माध्यमांच्या द्वारे लौकर पोचलो. तसं झालं नसतं तर आम्ही माहित झालो असतो की नाही कुणास ठाऊक ?"
गीतकार पी.सावळाराम यांनी माझ्या पत्राला उत्तर दिलं होतं आणि तेही अंतर्देशीय पत्राची तीनही पानं भरून. निमित्त होतं मी त्यांनी आकाशवाणीवर सादर केलेला 'विशेष गीतगंगा' कार्यक्रम ऐकल्याचं. मी त्यांना विचारलं होतं, "तुम्ही भावगीत लिहिण्यासाठी विशेष प्रयत्न केलेत का?" यावर त्यांनी खुलासा केला तो असा -
"विशेष प्रयत्न असे नाहीत..पण आनंदी भावनांशी समरस होण्यासाठी आपले मन संवेदनाक्षम ठेवण्याचा प्रयत्न जरूर केला. चिंतन केलं. ज्या व्यक्तिचा भाव असेल त्या व्यक्तिरेखेच्या स्वभाव-गुण विशेष आणि बोलभाषा हे जाणून घेतले. त्यासाठी बराच काळ थांबलोही. शब्द नादमधूर आणि अर्थवाही, शोधत राहिलो. भावनेच्या मधाळ पाण्यात सारखे भिजवत ठेवले ते शब्द आणि मगच गीते लिहिली. माझ्या नशिबाने लता, आशासारख्या स्वरकिन्नरी लाभल्या हे भाग्य!"
पत्र वाचून मी नतमस्तक झालो. प्रगल्भता आणि नम्रता हातात हात घालून वावरणारं ते व्यक्तिमत्व जेव्हा माझ्यासारख्या सामान्य रसिकाला हे सारं कुठलाही आडपडदा न ठेवता लिहितं तेव्हा स्तिमित होणं एवढंच आपल्या हाती राहातं. त्यांच्या नावानं ठेवलेल्या एका निबंधस्पर्धेत प्रथम क्रमांकाचं बक्षिस मिळवल्याबद्दल त्यांनी पत्र संपवता संपवता अभिनंदनही केलं होतं आणि माझ्या पत्राला उत्तर द्यायला उशीर झाला म्हणून क्षमायाचनाही केली होती.
कुठलाही आडपडदा न ठेवता' असं म्हणण्याचं कारण म्हणजे, गीतकार आणि कवी यांच्यातल्या सनातन भेदभावाबद्द्ल त्यांनी त्या पत्रात व्यक्त केलेली खंत -
"आम्ही भावगीतकार (हा शब्द त्यांनी अधोरेखीत केलेला) आहोत, कवि म्हणून आम्हाला मानायला बऱ्याच बुजुर्ग साहित्यिक कवींची इच्छा नव्हती. आमच्या लोकप्रियतेचा दुस्वास करण्यापलिकडे त्यास विशेष काही अर्थ होता असे मला वाटत नाही...जाऊ द्या!"

जेव्हा कुठल्याच क्षेत्रात म्हणावी एवढी गळेकापू स्पर्धा नव्हती त्या काळातल्या कविश्रेष्ठांची ही अवस्था. पण सुदैवानं आज हा वाद दिसत नाही. सारे कवी, गीतकार तेव्हढीच प्रसिद्धी, प्रतिष्ठा आपल्या कर्तृत्वानं बाळगून असतात हे किती चांगलं आहे. संमेलनाध्यक्षपदाच्या बाबतीतही 'पहले आप, पहले आप' असं झालं तर सोन्याहून पिवळं !

खरंच किती हा साधेपणा होता गीतकार आणि कवी पी.सावळाराम, तसेच नाना म्हणजे कै.जगदिश खेबुडकर यांच्या वागण्या बोलण्यात! पी.सावळाराम त्या पत्रात एके ठिकाणी लिहिते झाले...

"कवीचं काव्य रसिकांप्रत पोचलं पाहिजे. त्यांनी त्या काव्याचा रसास्वाद घेतल्याखेरीज कवीला काव्यनिर्मितीचं खरं समाधान वाटत नाही. तुमच्यासारख्या रसिकांची सदिच्छा जी आहे, तीच माझी खरी संपदा !"

'मधुसंचय' या पुस्तकात कवयित्री कै.शांता शेळकेंनी 'कवीचा स्वाभिमान' नावाच्या चार ओळी संग्रहीत केल्या आहेत त्या देण्याचा मोह, या पत्राच्या संदर्भानं, टाळता येत नाही...

›› माझे काव्य रसाळ रंजक असे ठावे जरी मन्मना
'द्या हो द्या अवधान द्या रसिकहो' का मी करू प्रार्थना ?
जाईची लतिका फुलून विखरी जै गंध सायन्तनी
येती भृंग स्वये रसार्थ, धरिती ते काय शंका मनी ? ‹‹

आजही जेव्हा जेव्हा हे पत्र मी वाचतो तेव्हा एवढंच म्हणावसं वाटतं की हे कविश्रेष्ठांनो, तुमच्यासारख्यांच्या प्रतिभेचा दरवळच असा आहे की रसास्वादासाठी भृंगे येतच राहतील, काव्यवाचन करत राहतील आणि गीते ऐकतच राहतील..जिवाचे कान करून.





# सोबतीला फक्त आठवणी

कुणाल रुद्राके

आजकाल त्याचं रुटीनंच होतं हे. कपाटाच्या ड्रॉवरमधून त्यानं गोळ्या बाहेर काढल्या. काही क्षण गोळ्यांचं पाकीट हातात तसंच घट्ट धरुन ठेवलं अन परत ड्रॉवरमधे टाकलं. कपाटाचं दार न लावता तो मागे सरकला, अगदी बेडला ठेचकाळेपर्यंत. भिंतीवरचं घड्याळ त्याची चेष्टा करत राहीलं अन झोप हुलकावणी देत राहीली. सहा महिन्यापासून ऊशाशी ठेवलेलं पुस्तक वाचण्याचा एक केविलवाणा प्रयत्न केला त्यानं. गेल्या सहा महिन्यात कधीच कॉंसंट्रेट करु शकला नाही तो अन आजही या गोष्टीला अपवाद नव्हता. पुस्तक बंद करुन तो तसाच असहाय्यपणे बिछान्यावर पडून राहीला.

पहाटेच्या सुमारे ३ वाजता त्यानं झोपायचा प्रयत्न सोडून दिला. त्याला कळून चुकलं होतं आजही तो झोपू शकणार नाही. त्यानं उठून बेडरुममधले दिवे लावले अन आरश्यात पाहीलं; थकलेला, अचेतन चेहरा वाटला त्याला स्वतःचा. डोळ्याभोवतालची काळी वर्तुळं आता दुर्लक्ष करण्यापलीकडे गडद दिसू लागली होती. तो परत सावकाश कपाटापाशी गेला, गोळ्यांचं पाकीट थरथरत्या हातानं उचलून त्यातली एक गोळी काढली अन घश्याखाली उतरवली. पाकीट तसंच धरुन ऊभा राहीला तो. एका गोळीनं बरं वाटणं शक्य नाही हे त्याला चांगलं माहीत होतं म्हणून अजून एक गोळी काढली त्यानं. गालावरुन अश्रू वाहत राहीले त्याच्या; तो जे करत होता त्यावर त्याचा स्वतःचा विश्वास बसेना. अँटी डिप्रेशन टॅबलेट्स घेण्यावाचून पर्याय नाही ही गोष्टंच त्याला आजवर पचनी पडत नव्हती. पण आज अश्रूंचा दुष्काळ संपला होता अन म्हणूनच की काय पण त्याला बरं वाटलं जरा. आश्चर्याची गोष्ट म्हणजे गेल्या कित्येक महीन्यापासून त्याला ठरवूनही रडू येत नव्हतं. त्या दिवसांत त्याला खरंच खूप एकाकीपणा जाणवत होता. स्वतःच्याच भावना समजून घ्यायला तो असमर्थ ठरत होता. नेमकं काय चुकतंय हेही कळेना. त्याला ओळखणाऱ्या कोणाचाही विश्वास बसला नसता की तो अँटी डिप्रेशन टॅबलेट्स घेत होता. कुणास ठाऊक गोळ्यांचा असर की आणखी काही पण त्याला बरं वाटलं. नेमकं काय चुकलं असावं याचा तो विचार करु लागला

www.esahity.com

अनुक्रमणिका

जिगसॉ पझल सोडवण्यासारखं होतं ते; सगळेच तुकडे त्याच्यासमोर होते पण अचूक ठिकाणी ठेवणं जमेना. कोडं सुटणार असं वाटत असतानाच त्याला झोप अनावर झाली अन विचार धुरकट होऊ लागले. असं सहा महिन्यात पहिल्यांदाच घडत होतं, हो गोळ्यांचा असर झाला होता खरं.
सकाळी तसा जरा ऊशिराच उठला तो. पण आज त्याला जरा फ्रेश वाटत होतं. तेच ते नीरस रुटीन त्याची वाट पाहतच होतं. तो तयार होत असताना ड्रायव्हर पार्कींगमधे त्याची वाट बघत होता. त्याच्या ऑफिसमधल्या आगमनानं अजून एका तथाकथित व्यस्त दिवसावर शिक्कामोर्तब झालं होतं. फोन, मिटींग्ज, मेल्स; त्यानं आज परत दुपारचं जेवण चुकवलं तसे त्याच्या डेस्कटॉपवरची "टू डू लिस्ट" अन टेबलावरच्या कॉफीच्या रीकाम्या कपांचा ढीग वाढत राहीला. एका क्लाएंटकडे जाता जाता त्यानं दिवसभराच्या कामाचा लेखाजोखा त्याच्या साहेबाला कळवला. नेहमीप्रमाणेच क्लाएंटसोबतची मिटींग चांगली झाली. त्याला माहीती होतं ही ऑर्डर त्यालाच मिळणार. आजकाल ऑर्डर्स, प्रायजेस, कौतुक अन या सगळ्या व्यावसायिक यशानं तो म्हणावं असा खुश होत नव्हता. कारपर्यंत जाता जाता त्यानं मिटींगदरम्यान रिसिव्ह न केलेल्या कॉल्सला उत्तरं देणं पसंत केलं.
त्याच्या परतीच्या प्रवासादरम्यान गडद काळ्या ढगांनी पूर्ण शहर झाकोळलं होतं. गाडीचा वेग वाढवता वाढवता त्याच्या ड्रायव्हरनं रेडिओचाही आवाज वाढवला. कोणी एक रेडिओ जॉकी शांत आवाजात विचारत होता, "सारं शहर मौसमातला पहीला पाऊस अनुभवत असताना तुम्ही काय करताय, आठवण येतेए कुणाची?? ओल्या मातीचा सुवास कुणा स्पेशल माणसाची आठवण करुन देतोय???" त्यानं मागच्या सीटवर बसल्या बसल्या डोळे मिटले. रेडिओचा आवाज हळूहळू कमी होत गेला अन आता गाडीच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबांचा आवाज त्याला स्पष्ट ऐकू येत होता, "तपर, तपूर, तिपुर". त्या संगीतानं काळजातली तार छेडली; अगदी वेगळा अन सुखद अनुभव होता तो. मिटल्या डोळ्यानंच तो हलकेच हसला. आर.जे.ची बडबड थांबली होती; रेडीओवरचं गाणं ऐकून तो भानावर आला. छतावरचे पावसाचे थेंब अन गाण्याचे बोल जादूई भासत होते. त्यानं ड्रायव्हरला गाडी बाजूला घ्यायला सांगितली, गळ्याचा टाय सैल करुन लॅपटॉप अन नोटपॅड सीटवर ठेऊन तो खाली उतरला. त्यानं दोन्ही हात पसरले, जणू तो पावसाला कवेत घेत होता. आर.जेचे शब्द त्याच्या कानात घुमत राहीले, "ओल्या मातीचा सुवास कुणा स्पेशल माणसाची आठवण करुन देतोय???" पावसाच्या एक अन एक थेंबानी आठवणी जाग्या झाल्या अन तो पोहचला थेट तिथे. त्यानं चालायला सुरुवात केली, आठवणींच्या वाटेवर... फोन करावासा वाटत होता त्या सर्वांना पण थोड्या दिवसापूर्वीच त्यानं सगळ्यांचे नंबर डिलीट केले होते. आठवणींकडे जाणाऱ्या चिखल मातीच्या वाटेवर चालत राहीला तो एकटा..

आतुरतेनं वाट बघावा असाच तो दिवस होता, पहीला पाऊस आला होता. ते कॉलेजच्या कँटीनमधे बसले होते. अंजू, जॉनी, सुमित, दृष्टी, तेजू अन तो त्यांच्या नेहमीच्या टेबलवर बसले होते. वीजेचा गडगडाट अन काळ्याभोर ढगांनी पहिल्या पावसाची चाहूल दिली होती अन थंड वाऱ्यानं सगळे सुखावले होते. तो हातानं लाकडी टेबल बडवत असताना अंजूनं गाणं म्हणायला सुरुवात केली, "भीगी भीगी भीगी जादूभरी लमहो की ये बाते.. देखो करने लगी हू मै बूँदोसे बाते..." "बावळट सगळं म्युझिक खराब केलंस" तो अंजूच्या अंगावर खेकसला अन नाकात आवाज काढून अन्नू मलिकची नक्कल करु लागला, " देखो बारीश हो रही है, ईट्स रेनिंग ईट्स रेनिंग.." सगळे तो विचित्र आवाज ऐकून हसले तशी अंजू ओरडली, "ए गपे, रेकू नकोस उगाच" सगळे अजूनच जोरात हसू लागले, अंजूनं त्याच्या खांद्यावर हात ठेवला अन त्या दोघांनीही बाकीच्यांच्या सूरात सूर मिसळला. "चल जाऊया.." अंजूनं त्याला नजरेनंच खुणावलं, तो झटकन उठला, बाकीचे त्यांच्या मागे निघाले. एकदा बटन दाबताच त्याची पल्सर चालू झाली, तो तेजूपाशी येऊन थांबला अन तिला मागे बसायची खूण केली. तेजूची अन अंजूची नजरानजर झाली अन तिला काही कळायच्या आतंच तिने मान खाली घातली. कोणास ठाऊक का पण अजून एक क्षणभरही अंजूशी नजर मिळवणं तिला शक्य नव्हतं. जॉनीला मागे खेचत अंजू त्याच्या मागे बसली अन जणू काही झालंच नसल्याच्या अविर्भावात ओरडली, "लेट्स गो". नेहमीप्रमाणे तेजू "व्यवस्थित" अंतर ठेऊन त्याच्या मागे बसली. अंजू कुठलसं नवं गाणं गात होती अन तो हॉर्न वाजवून बॅकग्राऊंड म्युझिक देत होता. त्या दोघांचं गायन वादन कौशल्य ऐकून त्यांच्या मित्रांसकट रस्त्यावरचे सगळेच वैतागले होते पण हे त्यांच्या गावी सुद्धा नव्हतं. ते त्यांच्या आवडत्या हॉटेलला पोहोचले. कॉलेज क्राऊडमधे प्रसिद्ध असणारं ते एक टिपीकल रोडसाईड स्नॅक्स जॉइंट होतं. एग रोल, व्हेज रोल, हा पफ तो पफ, कांदाभजी.. येस्स.. पावसाळ्याची परफेक्ट सुरुवात होती ती. पावसाचा वेग जसजसा वाढत होता तसतसं सगळ्यांनी आपापल्या आवडत्या स्नॅक्सचा बकणा भरायला सुरुवात केली. त्या छोट्याश्या शेडमधून बाहेर जाता जाता अंजूनं तिच्या बरोबर येण्यासाठी जॉनीला रिक्वेस्ट केली. खाण्यात दंग असलेल्या जॉनीनं तिची चेष्टा करुन आपसूकच तिला सुचवलं की, "आय ॲम नॉट इंटरेस्टेड". अंजूनं "त्याच्याकडे" पाहीलं, त्यानं उभं राहत तेजूचा हात खेचला अन तिलाही बाहेर चलण्याचा आग्रह केला. असू दे म्हणून अंजू एकटीच निघाली. बावळट जा ना, त्याच्या अंगावर ओरडली तेजू, कळत नाही तुला ती एकटी जातेय ते? तेजूचा हात सोडून तो तिच्यामागे धावला, तिला त्याची चाहूल लागली पण तिनं वळून पाहीलं नाही. त्यानं तिच्या खांद्यावर हात ठेवला पण ती शांत होती. दोघेही अबोलपणे चालत राहीले, पाऊस त्याच्या गतीनं पडत राहीला. तिनं भानावर येत त्याच्यापासून दूर जायचा प्रयत्न केला तसा त्यानं तिचा हात धरुन तिला त्याच्याकडे खेचलं..

ती वैतागली, चेहेऱ्यावर संताप, असहाय्यता संमिश्र भाव होते तिच्या. त्याला दूर लोटत म्हणाली ती त्याची अशी जवळीक बिलकुल आवडत नाही तिला. त्याला जरा आश्चर्यच वाटलं तिच्या वागण्याचं, स्पर्श बिर्शाची बंधनं कधीच नव्हती त्यांच्या मैत्रीत. त्यानं तिच्या हातावरची पकड ढिली केली तसा हात सोडवून घेत तिनं त्याच्याकडे पाठ फिरवली. ती वळतानाच नेमका तिच्या डोळ्यातलं पाणी गालावर आलं. पावसामुळे, की आजकाल दुसऱ्याच कुणाकडे जरा जास्तंच लक्ष असल्यानं, त्याला मात्र तिचे भरलेले डोळे दिसले नाहीत. ग्रुपमधले बाकी सगळे हॉटेलमधून त्यांच्याकडे बघत राहीले, ना त्यांना त्या दोघांचं संभाषण ऐकू आलं ना चेहेऱ्यावरचे भाव दिसले... पावसाचे थेंब तेवढे त्यांच्यातली दरी सांधत राहीलं. स्वतःला सावरत ती तिच्या जागेवर येऊन बसली; तो मात्र धक्क्यातून बाहेर आला नाही, रस्त्याच्या मधोमध तो भर पावसात गोठून राहीला. त्याच्याही नकळत त्यानं अंजूच्या डोळ्यात पाहीलं अन तो कळून चुकला की तिची नजरही त्याला अनोळखीपणाची जाणीव करुन देत होती. एरव्ही बोलक्या भासणाऱ्या नजरेनं आज त्याच्याशी अबोला धरला होता. वीजेच्या आवाजानं तो भानावर आला, कॉलेजमधल्या त्या पहिल्या पावसाचा विचार करत तो चालत राहीला एकटाच... "आजही". त्याला समजेना त्या दोघांमधे असा चटकन दुरावा का वाढला. हाच प्रश्न तो स्वतःला विचारत होता आजवर पण खरं उत्तर मिळालंच नाही. त्यानं अंजूलाही विचारायचा प्रयत्न केला पण प्रत्येक वेळेस तिनं विषय टाळला. ती नेहमीच म्हणायची सगळं काही ठीक आहे अन काहीच बदललं नाहीये आपल्यात. पण ज्या पद्धतीनं ती सांगायची की काहीच बदललं नाहीये त्यावरुनंच समजायचं त्याला आता सगळंच बदललंय. हो सारंच बदललं हे प्रकर्षानं जाणवायचं त्याला. पण त्याच्याकडे दोन प्रश्नांचं ऊत्तर कधीच नव्हतं: "कसं" आणि "का". सगळं त्याच्या डोळ्यासमोर घडलं, सगळं त्याला खूप जवळचं होतं आणि हो खरंच अगदी जिग्सॉ पझलसारखं; ज्याचे तुकडे तो कधीच जागच्या जागी लावू शकला नाही. परतीच्या वाटेवर त्याला अजूनच एकाकी वाटू लागलं. पाऊस थांबला होता पण जाता जाता एका प्रश्नाची आठवण करुन गेला होता ज्याचं खरं अन समाधानकारक ऊत्तर त्याला कधीच मिळणार नव्हतं.

तो घरी पोहोचला अन ओलेत्यानं तसाच कपाटासमोर येऊन बसला. सगळ्यात आधी त्यानं लॅपटॉप चालू करुन "ते" फोल्डर ओपन केलं. कॉलेजमधले कित्येक फोटोज होते त्यात. काही नॅचरल पोझ, काही वेड्यासारखे, काही नाटकी तर काही जबरदस्तीनं काढलेले पण सगळ्याच अमूल्य आठवणी. फोटोंनी हात धरुन नेलंच त्याला परत तिथे.

तो कँटीनमधे बसला होता अन नेहमीप्रमाणे त्याला काहीच काम नव्हतं. काय करावं विचार करत करत त्यानं अंजूच्या बॅगेतून लॅपटॉप काढला,

कुठल्याशा सोशल नेटवर्कींग साईटला कनेक्ट करायचा प्रयत्न केला पण वाय.फाय. सिग्नल वीक होता. स्ट्राँग सिग्नल मिळावा म्हणून नादानादात तो मेन बिल्डींगमधे गेला. सुमारे पंधरा एक मिनटांनी अंजू त्याला शोधत शोधत तिथे आली अन त्याला पाहताच त्याच्यावर ओरडली, "मूर्ख आहेस का रे तू? मी वेड्यासारखी पूर्ण कॉलेजमधे लॅपटॉप शोधत होते. फॉर गॉड्स सेक कांट यू बिहेव्ह यूअरसेल्फ? म्हणजे तू परमिशन घेण्याची गरज नाहीये पण तू कमीत कमी सांगायला तर हवं होतं की लॅपटॉप तुझ्याकडे आहे." ती.

सगळेजण तिचा अवतार पाहून शांत झाले. आय ॲम सॉरी, लॅपटॉप बंद करुन तिच्याकडे देताना म्हणाला तो. यार मला वाटलं लॅपटॉप बॅगेत नाही हे पाहिल्यावर कळेल तुला कि मी घेतला असेल, बोलताना आवाज खोल गेला त्याचा. “अरे यार, ईट शूड बी अ टू वे कम्युनिकेशन डॅम ईट, यू शूड ऑल्सो अंडरस्टँड माय सायलेंस” रडवेल्या आवाजात बोलली.

त्या आठवणींबद्दल परत विचार न करण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याला गालावर उबदार पाणी जाणवलं. अन त्याला जाणवलं हा एकटेपणा त्यानं निवडला होता कारण त्यानंच कॉल्सला उत्तर देणं, मेसेजेसला रीप्लाय करणं सोडून दिलं होतं. आणि ही गोष्ट फक्त अंजूपुरती मर्यादित नव्हती तर त्यानं सगळ्यांशीच संपर्क तोडला होता. पासआऊट होऊन जॉबमधे रुळल्यानंतर त्यानं सेलमधली सगळी कॉंटॅक्ट लिस्ट डिलीट केली अन जणू परतीचे सगळे मार्गच बंद केले. आताही त्याला नव्हता विचार करायचा या सगळ्याचा पण त्याच्या विचारांवर अन त्याच्या ॲक्शन्सवरही त्याचा कंट्रोल नव्हता. त्यानं कॉलेजपासून कपाटात जपून ठेवलेल्या चीजवस्तू बाहेर काढल्या. एक अन एक छोट्या गोष्टीमधे पार बुडून गेला; एकत्र पाहीलेल्या सिनेमाची तिकीटं, टिश्यू पेपर ज्यावर त्यांनी एकमेकांना वेड्यासारखे मेसेजेस लिहिले होते, टूथ पिक्स, गुलाबाची सुकलेली फूलं, त्यांची नावं असलेली फाडलेली वह्यांची शेवटची पानं, सेपिया टोनमधला एक फोटो ज्यात अंजूनं एक भुवई उडवली होती अन तो हातानं त्याची भुवई वर खेचून तिची नक्कल करत होता... समोरचं सगळं अंधुक दिसू लागलं तसं त्यानं सगळ्या चीजवस्तू कपाटात कोंबल्या. डोळे पुसत त्यानं त्याची जूनी डायरी शोधून काढली, घाईघाईनं अंजूच्या बर्थडेच्या पानावर गेला. गेल्या कित्येक वर्षात त्यानं तिच्या वाढदिवसाला तिला विश केलं नव्हतं तरीही त्याला तिचा बर्थडे अगदी ठळक आठवत होता. त्यानं हलकेच त्या पानावरुन हात फिरवला. तिनं त्या पानावर त्याच्यासाठी मेसेज लिहिला होता, "तुझ्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे ऊघड्या डोळ्यानं बघायला शिक, ट्राय टू सी द नेकेड ट्रूथ कॉझ आय विल नॉट बी ऑल्वेज देअर टू बी यूअर नेव्हीगेटर... लव्ह अंजू" त्याखालीच तिनं तिचा घरचा पत्ता अन फोन नंबर लिहिला होता. त्यानं घाईघाईनं फोन शोधला, क्षणभर हातात धरला घट्ट अन मग न रहावून नंबर डायल केला. बीप बीप बीप धडधड धडधड...फोन लागण्याआधी वाजणारे बीप ऐकून त्याच्या छातीतली धडधड वाढली अन तेव्हड्यात ऑपरेटरचा आवाज ऐकू आला त्याला, "

आपण डायल केलेला नंबर अस्तित्वात नाही". फोन बंद पडेपर्यंत त्यानं तसाच कानाशी दाबून धरला... बीप बीप बीप... कदाचित तिनं घर बदललं असावं किंवा फोन नंबर बदलला असेल की तिचं लग्न झालं? काही का असेना तिनं कळवलं नाही काहीच, क्षणभर वाटलं त्याला. फोन निसटला त्याच्या हातून अन डोळ्यातून गालावर ओघळलेला अश्रू तिच्या नावावरंच पडला; अन तो पुसताना तिचं नावंच डायरीतूनही पुसलं गेलं. जिग्सॉ पझलचे तुकडे परत त्याच्या डोक्यात भरकटत राहीले. त्यानं ड्रॉवर ऊघडला, गोळ्यांच्या पाकीटातून २ गोळ्या काढून खाल्ल्या अन पाकीट परत कपाटात टाकण्याआधी डोळे मिटून शांतपणे आसवांना मोकळी वाट करुन दिली.
त्याच्या नवीन डायरीत त्यादिवशी लिहिलं होतं, " मी एकटेपणा निवडला अन दुर्दैवानी मिळालाय मला तो फायनली. लोनर बाय चॉईस.. आता सोबतीला फक्त आठवणी!!!"



# भागम भाग

मच्छिंद्र म्हात्रे

दिनांक २८ जुलै २००५ . जवळ जवळ रात्रीचे नऊ वाजले होते. दोन दिवसापूर्वी झालेल्या पावसाने जणू आम्हा बैठ्या चाळीत राहणाऱ्यांवर सूड उगवला होता , हे असे दिवस पाहायला मिळतील हि कल्पना देखील केली नव्हती. पण त्या २६ जुलैच्या पावसाने सारं काही संपवलं होत, आता घरात फक्त राहिला होता तो ओलावा, मायेचा नाही तर चिखल मातीचा , सर्वत्र फक्त गाळ आणि गाळ त्यात लाईट नव्हती सर्वत्र फक्त अंधार. आज प्रत्येकाने स्वतःचं घर सावरून कसंबसं पुन्हा उभं केलं होत. आम्ही देखील दोन दिवसानंतर घर सावरून जेवून शांत झोपणार होतो. प्रत्येकजण थकला होता, नुकसान झालं होतं पण समाधान होतं कि आम्ही जिवंत होतो. त्याच आनंदात आम्ही जेवायला बसलो.
सर्वत्र शांतता होती, काही घास घेतो न घेतो तेवढ्यात बाहेरून अचानक गोंधळ ऐकू आला. बाहेर अनेकजण धावत आहेत असं जाणवलं, सुरवातीला आम्ही दुर्लक्ष केल. नंतर मात्र आवाज वाढतच गेला तेव्हा मात्र मी तडक बाहेर आलो. बाहेर चाळीत सर्वत्र अंधार होता, आमची चाळ पूर्णतः रिकामी झली होती. मागच्या चाळीतील काही लोक रस्त्याच्या दिशेने धावत होते. आमच्या येथील सर्व चाळी सोडल्या तर रस्त्यावर आणि पलीकडच्या सर्व इमारतीत लाईट होती. त्यामुळे तिथे धावणारी गर्दी स्पष्ट दिसत होती. मी ही रस्त्यावर आलो, तेथे पाहतो तर अनेक लोक सैरावैरा धावत होते, ते होते त्याच अवस्थेत धावत होते, प्रत्येकजण जीव तोडून धावत होता, पुरुष मंडळी आपले कपडे सावरत, कपडे घालत, काही नुसतेच लुंगी वरच धावत होते तर स्त्रिया मॅक्सीवरच, त्यातील प्रत्येकजण घाबरलेला दिसत होता, जो तो आपआपल्या कुटूंबासोबत पळत होता, एक मुलगा तर आपल्या आजीचा हात पकडून तिला चालत येत नसताना खेचत खेचत कसा-बसा धावत होता, काहीजण आपल्या म्हाताऱ्या आई वडिलांना उचलून धावत होते, हे काय चाललंय काही कळत नव्हतं.

मी त्यातल्या एकाला थांबवलं आणि विचारलं " भाऊ काय चाललंय, तुम्ही सर्व का पळताय?"  तो घाबरल्या सुरात दम खात म्हणाला, "अरे बाळा, विचारू नकोस जीव वाचवायचा असेल तर पळ, काल परवा झालेल्या पावसाने मिठी नदीची पातळी वाढली आहे त्यामुळे पाण्याच्या लाटा येतायत" दुसऱ्याने सांगीतले कि समुद्राचं पाणी जोराने याच दिशेने येतंय, त्यामुळे लवकर पळा".

आता ही काय नवीन भानगड? काही कळायला मार्ग पण नव्हता  तेव्हा फोनही बंद होते  आणि लाईट नसल्या कारणामुळे टी.व्ही देखील बंद त्यामुळे काय घडतंय हे कसं कळणार ? काही झाल्याशिवाय  एवढे लोक उगाच का पळतील? तेही शिकली सावरलेली लोक, यात नक्कीच काहीतरी तथ्य असणार, मी तडक घरी पळालो. घरातले सारे बाहेर आले होते. तेव्हा पर्यंत आमच्या जवळच्या सर्व चाळी रिकाम्या झाल्या होत्या. मी सर्वांना जे दिसलं ते सांगितलं आणि आम्ही देखील घरचं दार लावून समोरच्या इमारतीकडे निघालो. सर्वजण रस्त्यावर जमले होते. कित्येकजण जीव वाचवण्यासाठी इमारतीत जात होते, माझ्या बाबांनी आम्हाला इमारतीत जाण्यासाठी सांगितले, भीती एवढी होती कि क्षणार्धात आम्ही तिसऱ्या मजल्यावर पोहचलो,  पाण्याची पातळी केव्हढी असेल काही माहित नव्हतं त्यामुळे जास्तीत जास्त उंचीवर राहण्याचा आम्ही प्रयत्न करत होतो , काही जण तर गच्चीवरच गेले.  पुढे काय होणार? याच विचाराने सर्वजण घाबरले होते, दोन दिवसापूर्वी झालेल्या पावसाने घेतलेले बळी सर्वांना ठाऊक होतेच , त्यात त्सुनामीचा कहरही आठवत होता. आज आपणही मरणार कि काय? याची भीती प्रत्येकाच्या डोळ्यात दिसत होती, लोक अक्षरशः ओरडत ओरडत रडत होते,  पाणी कसं, कधी येईल त्याचीच वाट पाहत होतो आणि शक्य झाल्यास आम्ही आमची बरबादी स्वतःच्या डोळ्यांनी पाहणार होतो. मधून मधून कानावर येत होत कि लाटा जवळ येतायत काही तरी धरून रहा, तयारीत रहा . बस काही क्षण आणि सारं काही पाण्यात!! सारं चित्र स्पष्ट दिसत होतं, जवळ जवळ दहा मिनिटे झाली, तरीही पाणी आलं नव्हतं! काय झालं? ते मधेच थांबलं कि काय? कि दुसरीकडे वळलं? काय झालं असेल ? इतक्यात पोलिसांची गाडी फार वेगाने आली , पोलिसांची धावपळ पाहून खात्री झाली कि पाण्यापासून स्वतःचे रक्षण करा हे सांगण्यासाठी किवा पाणी जवळ आलंय हे सांगण्यासाठी ते आलेत तेवढ्यात त्यांनी जाहीर केलं कि , " कुणी ही घाबरू नका , पळू नका , ही अफवा आहे , काहीही घडलेलं नाही.

"च्या मारी  अफवा!! " झालं सर्वांचा जीव भांड्यात पडला, आता मात्र प्रत्येक जण हसत होता, कारण सर्वाना जाणवलं होतो कि आपण किती मूर्ख बनवलो गेलोय ते. आता मात्र जो तो घरी पळत होता आता भीती वाटत होती ती कि काही चोरी तर नसेल झाली याची, पण  असं काही झालं नाही, चाळीत सर्व जमा झाले, प्रत्येकजण दुसऱ्याला हसत होता, काही मिनिटे आधी जे काही घडलं ते फार गमतीदार होतं,लोक पळत होती पण काहीजण तर घरातील सामान घेऊन पळत होती, आमच्या बाजूचा भैया तर त्याचा टी. व्ही घेऊन पळत होता, काय हा असा ? कदाचित त्याला मरताना देखील आपली आवडती सिरीयल चुकवायची नसेल? असो, मोठी गंमत तर अशी कि आमच्या येथे तेव्हा कोणी तरी वारलं होत पण जेव्हा हि अफवा आली तेव्हा लोक ते प्रेत तसंच टाकून पळाली, बिचारं प्रेत !!!



# पर्यावरण विषयाची वही

जयसिंग कांबळे

*मी शाळेत असताना (कोणत्या वर्गात असेन आता आठवत नाही) एके  दिवशी आमच्या विषयांच्या वेळापत्रकात एक नवीन विषय आला 'पर्यावरण'. पहिल्यांदा आम्हाला (म्हणजे मला तरी) असं वाटलं "असा कुठे विषय असतो का? ....पर्यावरण ...आधीच आम्ही इतर विषयांना कंटाळलेलो.. त्यात एकाची नवी भर, त्याच्याआधीच कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, चित्रकला असे विषय होतेच. पण त्यांचं बरं होतं, कारण त्या विषयांच्या तासाला काय करायचं ते आम्हाला माहित होतं. 'कार्यानुभव' च्या तासाला कागदाचं घर बनवा, कागदाचे पक्षी बनवा असं काहीतरी मजेशीर चालायचं ...शा.शि.च्या तासाला नुसते कवायत आणि खेळ चालायचे. (या दोन विषयांची नावं आम्ही शोर्टकट मध्ये (संक्षिप्त) घ्यायचो. कार्यानुभवाला 'कार्या' शारीरिक शिक्षणाला 'शा.शि.' आणि नंतर पर्यावरणाला 'पर्या' असं म्हणायला लागलो)*

*तर ज्या दिवसापासून 'पर्यावरण' विषय आम्हाला आला, मला माझी साडेसाती कि काय असते ती सुरु झालीय असं वाटू लागलं. पहिल्याच दिवशी सरांनी सांगितलं "नवीन वही आणा, नवीन विषयाला नवीन वही". मी तर अजूनही दोन -तीन विषयांना एकच वही वापरायचो. नवीन वही आणायचं म्हणजे किमान शंभर पेजेस वहीला ४ रु. लागणार होते. आणि मला ते घरून मिळणार नव्हते. (कसे मिळणार? आमच्या बेलेंस मध्ये साधा रुपाया काय? ५० पैसे देखील नसायचे) मलाही समजायचं. पण सरांना कोण सांगणार? आणि नदाफ सर तर गावात नवीन... बाकीच्या सरांना माझी परिस्थिती माहित होती... दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी सरांनी विचारलं ""आणल्या का वह्या?" ज्यांनी ज्यांनी आणल्या होत्या त्यांनी त्यांनी दाखवल्या आणि ज्यांनी नव्हत्या आणल्या त्यांनी 'मंगळवारी घरचे आणणार आहेत बाजारातून' असं सांगितलं (मंगळवारी आठवडी बाजार भरतो आमच्याकडे) मलाही मग आयतंच कारण मिळालं...मी पण मंगळवारी आणतो म्हणालो.*

घरी गेल्यानंतर मी आईला म्हणालो "आय जमलं का? मंगळवार पतोर ...व्हय (वही) न्हाय घितली तर सर मारील मला ...त्येला बघितलं तरी भ्या वाटतंय ...पोरं म्हणत्यात मुशेलमान हाय त्यो (मंगळवारच्या बाजारात मुसलमान बकरं कापताना पाहिलेला आणि आईन भ्या घातलेलं" लय आगावपणा केलास तर मुशेलमानालाच दीन तुला (त्या दिवशी मी खेळण्यातली गाडी मागत हुतो आणि आयन भ्या घातलेलं ....आज मी आयला भ्या घालत होतो "आय, वही नाही घेतली तर मुसलमान असणारा सर मारील"
आईनं फक्त "बघतो" म्हणून आवरतं घेतलं.

बघता - बघता मंगळवार येऊनही गेला. ज्यांनी - ज्यांनी वही आणतो म्हणून सांगितलं होतं, त्यांनी त्यांनी वह्या आणल्या. मी मात्र तसाच उभा राहिलो. सर म्हणाले "का रे? का? वही नाही आणलीस ...सांगितलं होत ना वही पाहिजे म्हणून" .....मी गप्पच. बोलायला शब्दच फुटेना ...सर चालत - चालत माझ्याकडे आले ...मला वाटलं 'आता मेलो मी ... हा मारणार आपल्याला' मीही मागं-मागं सरू लागलो ... पळून जायच्या विचारात होतो मी... मी पळणार एवढ्यात त्या सरांनी मला पकडलं... वही नाही आणली म्हणून आणि पळायचा प्रयत्न केला म्हणून एकूण वीस छड्या मारल्या, दहा हातावर... दहा पायावर ...

सगळा वर्ग बघत होता माझ्याकडे ... माझ्या डोळ्यात पाणी जमा झालेलं ...पायावर छड्या खायची सवय नव्हती. माझ्या मार खाण्याचं मला काहीच वाटायचं नाही आणि वर्गालाही ...दोघांनाही सवय झालेली...'सरांचा मार खाणं म्हणजे आपल्या शरीराची ढाल करणं' असं मला वाटायचं तेव्हा... 'शरीराची ढाल केली कि शिक्षणावर होणारा खर्च वाचतो अथवा कमी होतो ...माझ असं व्हायचं कि 'मला मारल्या नंतरच सरांना समजायचं कि अमुक हि वस्तू घ्यायला माझ्याकडे पैसे नाहीत ... आणि माझ्या घरच्यांची ऐपतही नाही मग मला ती वस्तू माफ व्हायची किंवा दुसऱ्या कुणाची तरी मिळायची उदा.कंपोसपेटी ,रंगपेटी ,गाईड इ.

नदाफ सर नवीन होते,दिसायला गंभीर आणि त्यात भर म्हणजे मुसलमान होते (मुसलमानांची मी भीती घेतलेली लहानपणापासून) मला छड्या मारल्यानंतर म्हणाले "उद्या वही आण किंवा पालकांना घेऊन ये..."

घरचे कुणी शाळेत येणार नाहीत हे मला माहित होतंच. नेहमीप्रमाणे ....वडील आजारी होते आणि आईला भांगालायला (शेतात कामाला) जायचं होत...एका दिवसाला आईला दहा - बारा रु. मिळायचे आणि माझ्या शाळेसाठी ते बुडवायचे म्हणजे 'गवताच्या घरावर जळकं कोलीत फेकायचं' असं तिला वाटायचं ...

तेही खरंच होत, दोन - तीन महिने रोजगार मिळायचा .. .त्यात आम्ही चार तोंड खाणारी, घरात आजारी माणूस ...गावातल्या एका दुकानदाराकड जमीन गहाण पडलेली, ती ही सोडवायची होती ... कुणा -कुणाला पुरणार होती ती'

दुसऱ्या दिवशी मी शाळेत गेलो ....सकाळ पासूनचे सगळे तास बरे गेले 'पर्यावरणाचा' तास आल्यावर मला भीती वाटू लागली ..शेवटी घडायचं तेच घडलं ....वही आणली नाही म्हणून सरांनी मला बाहेर घालवलं वर्गाच्या आणि सांगितलं "वही किंवा पालकांना आणल्या शिवाय वर्गात यायचं नाही"

मीही घरी गेलो ...घराच्या खर्चाला आई कंटाळली होती दिवसभर राबूनही पोटाला पोटभर मिळायचं नाही ...तिची सारखी बडबड चालायची ...आजारी बापाला शिव्या देऊन ती आपल मन मोकळं करायची ...मला काही तिला सांगू वाटेना ....त्या दिवशी मीही जेवलो नाही ...मित्राकडं जाऊन बसलो ...सरांचा मार बऱ्याचदा खाल्लेला पण कुणी वर्गातून हाकलून दिलं नव्हत ...हे सगळ गरिबीमुळे घडतंय हे कळलेलं...

त्यानंतर चार दिवस शाळेतच गेलो नाही ....शाळेत जातो म्हणून घरातून निघायचो पण शाळेत जायचो नाही. नदी - नाल्यान फिरायचो ...माळावर जायचो ...झाडावर चढून बसायचो ...गुरां-ढोराच्या मागन फिरायचो. गुराखी माणसांसोबत दुपारच जेवायचो ...हळूहळू ही बातमी शाळेपर्यंत पोचली आणि आमच्या वर्गमित्रा मार्फत शाळेची चिठ्ठी घरी आली आमच्या बारकीनं (सुजाता) आईला वाचून दाखवली. त्यात लिहिलं होत 'तुमचा पाल्य शाळेत येत नाही ...त्याला शाळेत घेऊन यावे' हे ऐकल्यावर आईने मला मारायला सुरवात केली 'ती रक्ताच पाणी करून राबत होती नि मी शाळेच नावं करून गावभर फिरतोय याचा तिला खूप राग आलेला आणि तिला समजून घेणारं कुणी नाही याचं दुःख वाटत होतं आणि या दोन गोष्टींचा परिणाम होऊन तिनं मला इतकं मारलं कि आणि दोन दिवस मी शाळेत जाऊ शकलो नाही .

तिसऱ्या दिवशी आई मला शाळेत सोडायला आलेली...मी का? शाळेत येत नव्हतो हे मी तिला सांगितलेलं ..तिने गेल्यागेल्याच सरांना हात जोडले ...आपली परिस्थिती सांगितली आणि मला शाळेत बसवून ती निघून गेली ' आपल्या पोरावर हात उगारलेल्या माणसाला हात जोडून तिनं 'आईपण' सिध्द केलं 'कारण आई हा सर्वश्रेष्ठ गुरु असतो आणि एक गुरु दुसऱ्या गुरूचा हेतू समजू शकतो.'

सरांनी मला वर्गात बसवलं. आणि शिकवू लागले, तास संपल्या नंतर त्यांनी मुलांना सूचना दिली "उद्या आपण वही बनवायला शिकणार आहोत 'पर्यावरण पूरक वही' तरी सर्वांनी उद्या येताना गेल्या वर्षीच्या वहीतले, संपलेल्या वहीतले कोरे कागद आणि सुई -दोरा घेऊन येणे "

दुसऱ्या दिवशी सर्व मुले रद्दीचे कोरे कागद आणि सुई दोरा घेऊन आलेली ...मीही सर्व वह्या शोधल्या पण तीन पेक्षा जास्त पानं मला मिळाली नाहीत...बाकीच्या मुलांनी पंधरा - पंधरा वीस -वीस (मिळेल ती) पानं आणलेली ....मग सरांनी वही बनवायला शिकवली ...मुलांनीही दोघा - तिघात मिळून एक -एक वही तयार केली ...वह्या तयार केल्यानंतर त्या सगळ्या सरांच्या टेबलवर ठेवण्यात आल्या त्या वाह्यांकडे बघून सर सगळ्या वर्गाला उद्येश्यून म्हणाले "तुमच्या पैकी किती जणांना आपापली पानं परत पाहिजेत?" कुणीही हात वर केला नाही ...मग सरांनी विचारलं "ह्या सगळ्या वह्या मी जयसिंग ला दिल्या तर चालतील का?" आणि अख्ख्या वर्गाने "हो" असा जोरात गलका केला ...

मला गलबलून आलं...माझ्यासाठी अनपेक्षित धक्का होता ...सगळा वर्ग माझ्याकडे बघत होता ....माझ्या डोळ्यात पाणी होत ...पण ते नेहमी सारखं नव्हत...त्यातला भाव बदललेला होता ....त्या सगळ्या वह्या मला दिल्या....त्यातली एक वही मी पर्यावरण या विषयाला केली ...

योगायोगानं किंवा नशिबानं आज मी ' पर्यावरण ' क्षेत्रात कार्यरत आहे ....बऱ्याच दिवसापासून ही गोष्ट लिहायची होती....आज ती लिहू शकलो .....त्याच श्रेय माझ्या आयुष्याला घडवणाऱ्या माणसांना ,पक्ष्यांना, प्राण्यांना, हवेला, पाण्याला, नद्यांना, नाल्यांना, साऱ्या सृष्टीला ....पर्यावरणाला देतो .....धन्यवाद !

# तो गेला

कविता मोकाशी

शब्दनिर्मिती ठरली गौण
तो गेला निमिषात पुढे
मी केला आर्तभक्ती नाद
वाजवुनी कवितेचे चामडे

रक्तअश्रु ना कसला ओघळ
ओठात फक्त दीनगाणी
पाऊस झाला अंगणापुरता
घरात जमली भिक्षानाणी

आता वाटले निजेत उठावे
भेटुन घ्यावे अलिप्त अंबर
शापवंचना अभिमुख माझे
चंद्रडागाचे स्मरले अत्तर

तो गेला तो गेला तसाच
आल्या पावसातून नाहुन
निळी निळी शाई नभाची
मेघ होड्या त्यात वाहुन



# पाडगावकरांचा जिप्सी

मयुरी बिरारी-खैरनार

कसे व्यस्त दिनरात
साच्यामधे बांधलेले
फाटलेल्या भावनांना
नियमांनी सांधलेले

दिनभर ऑफिसात
फाईलींचा हा गराडा
दहा वीस मिनीटात
कविमनाचा चुराडा

तेवढ्यात आला कोणी
दाराच्या आडून
आजवर होता माझ्या
मनात दडून

खुणावू लागला मज
दूर दूर जाया
क्षितीजाच्या अंगणात
भ्रमण कराया

घरटयात राहूनही
आकाशाची ओढ
मोकळ्या वाऱ्याला जशी
स्वैरतेची खोड

विहरत होता
मुक्त सहजपणाने
आपल्या मस्तीत जसा
आपल्या मनाने

पाझरत होता त्याच्या
डॊळयात आनंद
भणंग अवस्था तरी
उत्सवात धुंद

चिंता नाही उद्याची
ना दुःख प्राक्तनाचे
भय नाही पराजय
सुख ना जीताचे

ओळखले त्याला मीही
लगेच दूरून
नेहमीच वाचलेल्या
कविता स्मरून

जुना झाला तरी
आहे आजही तरूण
कविमनातला जिप्सी
खोल मनात दडून

# शपथ

सदानंद बेंद्रे

फार झाले बोल ना सुटली शपथ
मीच सांगू का पुन्हा कुठली शपथ

बोल काही, देह झाला कान हा
का जिवावर आज ही उठली शपथ

पाळणे शपथा तुला जमले कधी
एक मीही मोडतो, फिटली शपथ

वेस ओलांडू नका, समजाव तू
आसवांना घाल धुरकटली शपथ

गाव हा परका चलन इथले नवे
चालते ना या इथे तिथली शपथ

लाव डावावर सखे काही नवे
तोच तो माझा गळा विटली शपथ

ती निघाली त्या क्षणी आलास तू
पावसा नक्की तुला पटली शपथ

बंद ओठांनीच घालू ये जरा
मोकळ्या शब्दात घुसमटली शपथ

कोणही बघणार नाही ऐक तू
तावदाने घट्ट मी मिटली, शपथ



# कसे सावरू ?

नाम गुम जायेगा

काय करू, कसे करू
कसे सावरू
छळतात आठवणी
कशा विसरू

आठवणी जुन्या ताज्या
अंगचटी येती माझ्या
भिववाया येती मला
किती घाबरू

बाल सौंगडी जमती
मस्त धिंगाणा घालती
खेळताना जायबंदी
लागतो हरु

तारुण्याची नंगी भुतं
अंगोपांगी नाचतात
उफ़ाळून येती, कसा
उगी मी करू

आडवाटे आडक्षणी
अडवतो भास कुणी
श्वास श्वास तुटे तुटे
कसा आवरु

# ई साहित्य प्रतिष्ठान
# बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

इत्यर्थचा दिवाळी अंक कसा वाटला? छान आहे ना? तुम्ही आम्हाला सांगितलं तरच आम्हाला कळेल ना! तुमच्यासाठी एवढं पानंच्यापानं लिहिणाऱ्या त्या लेखक लेखिकेला, तुम्ही काही ना काही कळवलंच नाहीत तर त्या पुढचं पुस्तक तुम्हाला कसं देणार? एक ई मेल तर पाठवायची. किंवा एक फोन. हे लेखक, हे डिझायनर्स मराठी भाषेवरच्या प्रेमाने हे सगळं काम विनामूल्य करत असतात आणि म्हणून इतकं सुंदर साहित्य इतक्या सुंदर पुस्तकात तुमच्या पर्यंत पोहोचवू शकतो आम्ही.
त्यांच्यासाठी तुम्ही दोन शब्द सांगणार ना?
मोबाईल/इंटरनेटमुळे कधी नाही इतकं जग जवळ आलं. अत्यंत कमी खर्चात ई पुस्तकं बनवता येऊ लागली आणि लाखो वाचकांपर्यंत वितरण करणं शक्य झालं. त्यामुळे नवनवीन लेखकांसाठी एक व्यासपीठ उभं झालं. आणि वाचकांना प्रतिक्रिया देणंही सोपं झालं.
मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. कधी कधी त्यांना योग्यवेळी माती खत पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. खत-पाणी म्हणजे वाचकांच्या प्रतिक्रिया, पत्रं, मतं, शाबासकी, दाद.
दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना नवीन पुस्तकं मिळत नाहीत. प्रयोग परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही.
अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरित करायला सुरूवात केली.
चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. कथा, कादंबऱ्या, कविता, प्रवासवर्णने सर्वकाही सव्वा लाख वाचकांपर्यंत विनामूल्य पोहोचत असतं. चारशेहून अधिक नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर झाले. त्यातील अनेकजण आज यशस्वी लेखक होताना दिसत आहेत. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ पुढे जात आहे.  प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य पुढे येत आहे. विनोद, बालसाहित्य,  शास्त्रीय संगीत,  किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिका, मराठमोळा इतिहास असे सर्व काही ई साहित्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचते आहे.

"जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच.
सव्वा लाख रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? मग त्यासाठी आपली मदत हवी दोस्तांनो.
फ़ार काही नाही बंधो. एकही पैसा नका देऊ. वेळही नका दवडू. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी वाचावे अशी तुमची इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला या पुढची ई पुस्तके सर्वात आधी मिळतील. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल. होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?
आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.
खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

www.esahity.com
www.ednyaneshwari.
www.marathiriyasa